जनसंपर्क कक्ष
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर

27 FEB 2020

तरुण भारत

# लोककला हेच भारतीय संस्कृतीचे संचित

## कुलगुरू डॉ. देवानंद शिंदे : उत्सव मराठीचा कार्यक्रम उत्साहात

प्रतिनिधी
कोल्हापूर

पारंपारिक लोककलेचा वारसा जपण्याबरोबर संवर्धनही करण्याची गरज आहे. मराठी भाषा गौरव दिन विविध सांस्कृतिक कार्यक्रमांनी साजरा केला जातो. यामध्ये लोप पावत चाललेल्या लोककलांचे सादरीकरणही केले जाते. कारण लोककला हेच भारतीय संस्कृतीचे संचित आहे, असे प्रतिपादन कुलगुरू डॉ. देवानंद शिंदे यांनी केले.

शिवाजी विद्यापीठातील मराठी अधिविभागाच्या वतीने मराठी भाषा गौरव दिनानिमित्त 'लोकसाहित्य: उत्सव मराठीचा' या महोत्सवाचे आयोजन वि. स. खांडेकर भाषा भवन येथे केले होते. या महोत्सवाच्या उद्घाटनप्रसंगी ते बोलत होते. प्र-कुलगुरू डॉ. डी. टी. शिर्के यांची प्रमुख उपस्थिती होती. कवी कुसुमाग्रज आणि सरोजिनी बाबर यांच्या प्रतिमांचे पुजन करून महोत्सवाची सुरूवात करण्यात आली. याप्रसंगी चित्रकार भास्कर हांडे यांनी अक्षरचित्र रेखाटन केलेल्या प्रतिमेचे अनावरण कुलगुरू डॉ. शिंदे यांच्या हस्ते करण्यात आले.



कोल्हापूर : चित्रकार भास्कर हांडे यांच्या अक्षरचित्राच्या प्रतिकृतीचे अनावरण करताना कुलगुरू डॉ. देवानंद शिंदे व प्र-कुलगुरू डॉ. डी. टी. शिर्के. सोबत डॉ. नंदकुमार मोरे, डॉ. मेघा पानसरे, डॉ. रणधीर शिंदे, किरण गुरव आदी.

कुलगुरू डॉ. शिंदे म्हणाले, प्रमाण भाषेचे अवडंबर माजविताना बोली भाषा, लोकभाषा, मातृभाषांकडे संकुचित पद्धतीने पाहिले जाते. हा संकुचित दृष्टीकोन दूर करण्याची गरज आहे. लोककलेला व्यापक स्वरुप प्राप्त होण्यासाठी सर्वांनी प्रयत्न केले पाहिजेत. लोकसंगीत, लोककला आणि लोकसाहित्य हा राज्याचा वारसा आहे. भारतीय संस्कृतीचे संचित म्हणून लोककलेकडे पाहिले पाहिजे. जो समाज आपला इतिहास विसरतो, तो इतिहास घडवू शकत नाही, असे डॉ. बाबासाहेब आंबेडकरांचे विचार होते. त्यानुसार आपला हा वारसा आपण विसरुन चालणार नाही. त्यामुळे लोककलांचे संवर्धन करण्याची आपली जबबादारी आहेच, मात्र त्याच वेळीं आजच्या काळात विवेकवादाला नकार देणे हे सुद्धा योग्य होणार नाही. प्र-कुलगुरू डॉ. डी.टी. शिर्के म्हणाले, भारतीय संस्कृतीचा ठेवा असलेल्या कलाविष्कारांचा काळाबरोबर ऱ्हास होऊ नये. सोशल मीडियाच्या काळामध्ये या कलाविष्कारांचे जतन करण्यासाठी त्यांचे स्वरुप बदलण्याची गरज आहे.

मराठी अधिविभागाप्रमुख डॉ. रणधीर शिंदे यांनी प्रास्ताविक केले. डॉ. नंदकुमार मोरे यांनी आभार मानले. यावेळी डॉ. अंजली निगवेकर, डॉ. मेघा पानसरे, साहित्यिक किरण गुरव, लोककलाप्रेमी जनता, विद्यार्थी, विद्यार्थिनी मोठ्या संख्येने उपस्थित होते.

**बहारदार सादरीकरण...**

लोककला महोत्सवामध्ये जात्यावरील ओव्या, धनगरी ओव्या, गजनृत्य, गण-गवळण, लावणी, भेदिक शाहिरी, राष्ट्रीय शाहिरी, झिम्मा फुगडी, पोतराज, वासुदेव आदी लोककलांचे बहारदार सादरीकरण करण्यात आले.

# लोककलेचे संवर्धन आवश्यक

## कुलगुरू डॉ. शिंदे; विद्यापीठात लोककला महोत्सव

**कोल्हापूर : पुढारी वृत्तसेवा**

लोककला हेच आपल्या संस्कृतीचे संचित असून पारंपरिक लोककलेचा वारसा जपण्याबरोबरच त्याचे संवर्धन करणे आवश्यक आहे. त्या दृष्टीने मराठी भाषा गौरव दिनानिमित्त विद्यापीठाच्या मराठी विभागातर्फे आयोजित विशेष लोककला महोत्सव अत्यंत स्तुत्य स्वरूपाचा आहे, असे गौरवोद्गार शिवाजी विद्यापीठाचे कुलगुरू डॉ. देवानंद शिंदे यांनी बुधवारी काढले.



**कोल्हापूर : लोककला महोत्सवात बोलताना कुलगुरू डॉ. देवानंद शिंदे. व्यासपीठावर डावीकडून नंदकुमार मोरे, अंजली निगवेकर, प्र. कुलगुरू डॉ. डी. टी. शिर्के, रणधीर शिंदे, मेघा पानसरे आदी. (छाया : पप्पू अत्तार)**

शिवाजी विद्यापीठाच्या मराठी अधिविभागामार्फत मराठी भाषा गौरव दिनानिमित्त 'लोकसाहित्य: उत्सव मराठीचा' या लोककला महोत्सवाचे आयोजन वि. स. खांडेकर भाषा भवन सभागृहामध्ये करण्यात आले. त्यावेळी कार्यक्रमाच्या उद्घाटनप्रसंगी कुलगुरू डॉ.शिंदे बोलत होते. प्र-कुलगुरू डॉ. डी. टी. शिर्के यांची प्रमुख उपस्थिती होती.

डॉ. शिंदे म्हणाले, प्रमाणभाषेचे अवडंबर माजविताना बोलीभाषा, लोकभाषा, मातृभाषा याकडे संकुचित पद्धतीने पाहिले जाते. हा संकुचित दृष्टिकोन दूर करणे आवश्यक आहे. लोकसंगीत, लोककला आणि लोकसाहित्य हा आपला वारसा आहे. त्याकडे काही तरी ग्राम्य म्हणून पाहणे उचित नाही, ते आपल्या संस्कृतीचे खरे संचित आहे, या भावनेतून त्याकडे पाहिले जाणे आवश्यक आहे. जो समाज आपला इतिहास विसरतो, तो इतिहास घडवू शकत नाही, असे डॉ. बाबासाहेब आंबेडकरांचे विचार होते. त्यानुसार आपला हा वारसा आपण विसरून चालणार नाही.

याप्रसंगी प्र-कुलगुरू डॉ. डी. टी. शिर्के म्हणाले, आपल्या संस्कृतीचा ठेवा असलेल्या कलाविष्कारांचा काळाबरोबर ऱ्हास होऊ नये, यासाठी काळजी घ्या.

प्रारंभी कवी कुसुमाग्रज आणि सरोजिनी बाबर यांच्या प्रतिमांचे पूजन करण्यात आले. याप्रसंगी चित्रकार भास्कर हांडे यांनी अक्षरचित्र रेखाटन केलेल्या प्रतिमेचे अनावरण कुलगुरू डॉ. शिंदे यांच्या हस्ते करण्यात आले.

दरम्यान, या लोककला महोत्सवामध्ये जात्यावरील ओव्या, धनगरी ओव्या, गजनृत्य, गण-गवळण, लावणी व बैठकीची लावणी, भेदिक शाहिरी, राष्ट्रीय शाहिरी, झिम्मा-फुगडी, पोतराज, वासुदेव यांचे वैविध्यपूर्ण पद्धतीने सादरीकरण करण्यात आले.

मराठी अधिविभागाप्रमुख डॉ. रणधीर शिंदे यांनी स्वागत व प्रास्ताविक केले. डॉ. नंदकुमार मोरे यांनी आभार मानले. डॉ. अंजली निगवेकर, डॉ.मेघा पानसरे, किरण गुरव यांच्यासह मराठी भाषा आणि लोककलाप्रेमी जनता, विद्यार्थी, विद्यार्थिनी मोठ्या संख्येने उपस्थित होते.

# लोककला संस्कृतीचे संचित

म. टा. प्रतिनिधी, कोल्हापूर

'लोककला हेच आपल्या संस्कृतीचे संचित असून पारंपरिक लोककलेचा वारसा जपण्याबरोबरच त्याचे संवर्धन करणे आवश्यक आहे. त्या दृष्टीने मराठी भाषा गौरव दिनानिमित्त मराठी विभागातर्फे आयोजित विशेष लोककला महोत्सव अत्यंत स्तुत्य स्वरुपाचा आहे,' असे कौतुकोद्गार शिवाजी विद्यापीठाचे कुलगुरू डॉ. देवानंद शिंदे यांनी काढले. मराठी भाषा गौरव दिनानिमित्त 'लोकसाहित्य : उत्सव मराठीचा' या लोककला महोत्सवाच्या उद्घाटनप्रसंगी कुलगुरू बोलत होते. वि. स. खांडेकर भाषा भवनातील कार्यक्रमाला प्र-कुलगुरू डॉ. डी.टी. शिर्के यांची प्रमुख उपस्थित होते.



शिवाजी विद्यापीठात मराठी भाषा गौरव दिन कार्यक्रमात चित्रकार भास्कर हांडे यांच्या अक्षरचित्राच्या प्रतिकृतीचे अनावरण करताना कुलगुरू डॉ. देवानंद शिंदे व प्र-कुलगुरू डॉ. डी.टी. शिर्के. शेजारी डॉ. नंदकुमार मोरे, डॉ. मेघा पानसरे, डॉ. रणधीर शिंदे, किरण गुरव.

## कुलगुरू शिंदे; मराठी भाषा दिनानिमित्त महोत्सव

कुलगुरू डॉ. शिंदे म्हणाले, 'प्रमाण भाषेचे अवडंबर माजविताना बोलीभाषा, लोकभाषा, मातृभाषा याकडे संकुचित पद्धतीने पाहिले जाते. हा संकुचित दृष्टिकोन दूर करणे आवश्यक आहे. महाराष्ट्रातील लोककलेला व्यापक स्वरूप प्राप्त होण्यासाठी सर्वांनी मिळून प्रयत्न केले पाहिजेत. मातृभाषेचे जतन करण्यासाठी प्रयत्नशील असणे गरजेचे आहे. लोकसंगीत, लोककला आणि लोकसाहित्य हा आपला वारसा आहे. जो समाज आपला इतिहास विसरतो, तो इतिहास घडवू शकत नाही, असे डॉ. बाबासाहेब आंबेडकरांचे विचार होते. आपण वारसा विसरुन चालणार नाही.'

यावेळी कवी कुसुमाग्रज आणि डॉ. सरोजिनी बाबर यांच्या प्रतिमांचे पूजन करण्यात आले. चित्रकार भास्कर हांडे यांनी अक्षरचित्र रेखाटन केलेल्या प्रतिमेचे अनावरण कुलगुरू डॉ.शिंदे यांच्या हस्ते करण्यात आले. या लोककला महोत्सवामध्ये जात्यावरील ओव्या, धनगरी ओव्या, गजनृत्य, गण-गवळण, लावणी व बैठकीची लावणी, भेदिक शाहिरी, राष्ट्रीय शाहिरी, झिम्मा फुगडी, पोतराज, वासुदेव यांचे पद्धतीने सादरीकरण करण्यात आले. मराठी अधिविभागप्रमुख डॉ. रणधीर शिंदे यांनी स्वागत केले. डॉ. नंदकुमार मोरे यांनी आभार मानले. अधिविभागप्रमुख डॉ. अंजली निगवेकर, डॉ. मेघा पानसरे, किरण गुरव उपस्थित होते.

# लाभले आम्हास भाग्य बोलतो मराठी; 'मायमराठी'चा जागर

## शिवाजी विद्यापीठाचा पुढाकार : 'विद्यार्थी विभागाच्या भेटीला' उपक्रमात २९१ महाविद्यालयांचा सहभाग

संतोष मिठारी ।
लोकमत न्यूज नेटवर्क

**कोल्हापूर :** नोकरी, व्यवसायासाठी गरज म्हणून इंग्रजी, तर अधिकची पात्रता म्हणून विदेशी भाषा शिकण्याकडील कल सध्या वाढत आहे. अशा परिस्थितीत मराठी भाषेबाबतची जाणीव विद्यार्थ्यांमध्ये कायम राहावी, यासाठी शिवाजी विद्यापीठाच्या मराठी विभागातर्फे 'विद्यार्थी विभागाच्या भेटीला' उपक्रम राबविला जात आहे. त्यातून 'मायमराठी'चा जागर सुरु आहे.

विद्यापीठ संलग्नित कोल्हापूर, सांगली, सातारा जिल्ह्यांतील २९१ महाविद्यालयांतील विद्यार्थ्यांसाठी हा उपक्रम राबविण्यात येतो. मराठी विभागात दर महिन्याला असणाऱ्या चर्चासत्र, व्याख्याने, परिसंवाद, आदी कार्यक्रमांवेळी दोन ते तीन महाविद्यालयांतील विद्यार्थ्यांना निमंत्रित केले जाते. त्यांना मराठी भाषेचा इतिहास, तिचे महत्त्व, त्यातील साहित्य, विभागातर्फे राबविण्यात येणारे विविध उपक्रम, अभ्यासक्रम, मराठी भाषा क्षेत्रातील रोजगार आणि उच्च शिक्षणाच्या संधींची माहिती दिली जाते. मराठी भाषेच्या प्रसारातील त्यांच्या नवकल्पना, संकल्पना जाणून घेण्यासाठी त्यांच्याशी संवाद साधण्यात येतो. वि. स. खांडेकर स्मृतिसंग्रहालय, बॅरिस्टर बाळासाहेब खर्डेकर ज्ञानस्रोत केंद्र (ग्रंथालय) त्यांना दाखविण्यात येते. १ ते १५ जानेवारीदरम्यान साजरा केला जाणाऱ्या मराठी भाषा संवर्धन पंधरवडा उपक्रमाअंतर्गत बोलीभाषा संकलन, प्रमाण मराठी लेखन, नवोदित लेखक मार्गदर्शन, कथा व कविता लेखन कार्यशाळा, विद्यार्थी लेखक संवाद, कविसंमेलन, युनिकोड आणि विकिपीडिया कार्यशाळा घेतली जाते. दरवर्षी २०० विद्यार्थ्यांना संगणकावर मराठीचा वापर करण्याचे प्रशिक्षण दिले जाते. गेल्या तीन वर्षांमध्ये या उपक्रमांमध्ये सहा हजारांहून अधिक विद्यार्थी सहभागी झाले आहेत. 'मायमराठी'चा जागर करण्याचा मराठी विभागाचा हा उपक्रम आदर्शवत ठरणारा आहे.

जागतिक
मराठी राज्यभाषा दिन



शिवाजी विद्यापीठातील मराठी विभागातर्फे आयोजित 'विद्यार्थी विभागाच्या भेटीला' या उपक्रमात बुधवारी विभागप्रमुख प्रा. डॉ. रणधीर शिंदे यांनी मार्गदर्शन केले. यावेळी शेजारी डॉ. नंदकुमार मोरे उपस्थित होते. -

### व्याप्ती वाढविणार

मराठी विभाग हा भाषा, साहित्यसंबंधी विविध उपक्रम राबवीत आहे. 'विद्यार्थी विभागाच्या भेटीला' उपक्रमातून मराठी भाषेचा प्रसार, प्रचार केला जात आहे. या उपक्रमाची व्याप्ती वाढविण्यात येणार असल्याचे मराठी विभागप्रमुख प्रा. डॉ. रणधीर शिंदे यांनी बुधवारी सांगितले. विभागाअंतर्गत संत तुकाराम, महर्षी विठ्ठल रामजी शिंदे, अण्णा भाऊ साठे अध्यासने कार्यरत आहेत.

/ विशेष पान - हॅलो ८ वर

"विद्यार्थ्यांमध्ये भाषा आणि साहित्यविषयक जागृती निर्माण करण्यासाठी मराठी विभागाचा हा उपक्रम उपयोगी ठरत आहे. त्यातून मातृभाषेतून करिअर करण्याबाबत नव्या क्षेत्राची माहिती मिळते.

-ज्योती चौरे, विद्यार्थिनी, महावीर महाविद्यालय

"मराठीचा महाराष्ट्राबाहेर कोंडमारा सुरु आहे. ते थांबविण्यासाठी कृतिशील कार्यक्रम राबविण्याची गरज आहे. मराठी अनेक बोलींना सामावून घेणारी भाषा आहे. त्यामुळे तिच्या बोलींचाही शास्त्रशुद्ध अभ्यास व्हावा.

- डॉ. नंदकुमार मोरे

### मराठी विभाग दृष्टिक्षेपात

| विभागाची स्थापना | विकिपीडियावर विभागाने अद्ययावत केलेल्या नोंदी | पीएच.डी.धारक संख्या | एम.फिल. धारकांची संख्या | पदव्युत्तर अभ्यासक्रमांची संख्या |
|---|---|---|---|---|
| १९७९ | १०० | २०० | १७५ | १९ |

# शिवाजी विद्यापीठात रंगला लोककलेचा उत्सव

## ओव्या, लावणी, गजनृत्याचा समावेश : मराठी भाषा गौरव दिनानिमित्त मराठी अधिविभागातर्फे महोत्सव

लोकमत न्यूज नेटवर्क





शिवाजी विद्यापीठात बुधवारी मराठी अधिविभागातर्फे आयोजित लोककला महोत्सवात आरेवाडी (ता. कवठेमहांकाळ) येथील बिरोबा गजनृत्य वालूग मंडळाच्या कलाकारांनी गजनृत्य सादर केले. दुसऱ्या छायाचित्रात लोककला महोत्सवात कुरळप (जि. सांगली) येथील श्री बिरदेव भैरुसिद्ध ओवीकार मंडळाच्या कलाकारांनी धनगरी ओव्या सादर केल्या.

**कोल्हापूर :** जात्यावरील ओव्या, धनगरी ओव्या, गजनृत्य, गण-गवळण, लावणी व बैठकीची लावणी, भेदिक आणि राष्ट्रीय शाहिरी, पोतराज, वासुदेव, झिम्मा-फुगडीच्या सादरीकरणाने बुधवारी शिवाजी विद्यापीठात लोककला महोत्सव रंगला. मराठी भाषा गौरव दिनानिमित्त विद्यापीठाच्या मराठी अधिविभागातर्फे हा महोत्सव घेण्यात आला.

वि. स. खांडेकर भाषा भवन सभागृहामधील 'लोकसाहित्य : उत्सव मराठीचा' या लोककला महोत्सवाचे उद्घाटन कुलगुरू डॉ. देवानंद शिंदे यांच्या हस्ते झाले. यावेळी प्र-कुलगुरू डॉ. डी. टी. शिर्के प्रमुख उपस्थित होते. लोककला हेच आपल्या संस्कृतीचे संचित असून, पारंपरिक लोककलेचा वारसा जपण्यासह त्याचे संवर्धन करणे आवश्यक आहे. त्यादृष्टीने लोककला महोत्सवाचा उपक्रम अत्यंत स्तुत्य स्वरुपाचा आहे. महाराष्ट्रातील लोककलेला व्यापक स्वरुप प्राप्त होण्यासाठी सर्वांनी मिळून प्रयत्न केले पाहिजेत. मातृभाषेच्या जतनासाठी प्रयत्नशील असणे गरजेचे असल्याचे डॉ. शिंदे यांनी सांगितले.

कलाविष्कारांचा काळाबरोबर ऱ्हास होऊ नये. सोशल मीडियाच्या काळामध्ये या कलाविष्कारांचे जतन करण्यासाठी त्यांचे स्वरूप बदलण्याचा प्रयत्न करा, असे आवाहन डॉ. शिर्के यांनी केले. प्रारंभी कवी कुसुमाग्रज व सरोजिनी बाबर यांच्या प्रतिमांचे पूजन करण्यात आले. चित्रकार भास्कर हांडे यांनी अक्षरचित्र रेखाटन केलेल्या प्रतिमेचे अनावरण डॉ. शिंदे यांनी केले. यावेळी संगीत आणि नाट्यशास्त्र अधिविभागप्रमुख डॉ. अंजली निगवेकर, विदेशी भाषा अधिविभागप्रमुख डॉ. मेघा पानसरे, साहित्यिक किरण गुरव, आदी उपस्थित होते. मराठी अधिविभागप्रमुख डॉ. रणधीर शिंदे यांनी प्रास्ताविक केले. डॉ. नंदकुमार मोरे यांनी आभार मानले.

### या मंडळांकडून सादरीकरण

जात्यावरील ओव्या (सावित्रीबाई लोककला पथक, धुंदवडे), धनगरी ओव्या (बिरदेव भैरुसिद्ध ओवीकार मंडळ, कुरळप), गजनृत्य (बिरोबा गजनृत्य वालूग मंडळ, आरेवाडी), गणगवळण (शाहीर सुरेश कांडगावकर आणि सहकारी), लावणी आणि बैठकीची लावणी (सुनीता कांडगावकर आणि सहकारी), भेदिक शाहिरी (शाहीर हिंदुराव पाटील आणि सहकारी), राष्ट्रीय शाहिरी (शाहीर रंगराव पाटील आणि सहकारी), झिम्मा-फुगडी (जिजाऊ लोककला व लेझीम पथक, धुंदवडे), पोतराज (अंकुश कसबे), वासुदेव (रणवीर वासुदेव) हे कलाप्रकार सादर केले.



## लोककला महोत्सव...

कोल्हापूर : शिवाजी विद्यापीठात आयोजित लोककला महोत्सवात गजनृत्य सादर करताना आरेवाडी (ता. कवठेमहांकाळ) येथील बिरदेव गजनृत्य वालूग मंडळाचे लोककलाकार. (मोहन मेस्त्री : सकाळ छायाचित्रसेवा) बातमी : पान ३ »

# लोककला हेच संस्कृतीचे संचित

## डॉ. देवानंद शिंदे; विद्यापीठात लोककला महोत्सवातून लोकसंस्कृतीचा जागर

सकाळ वृत्तसेवा

**कोल्हापूर, ता. २६ : लोककला हेच आपल्या संस्कृतीचे संचित असून, पारंपरिक लोककलेचा वारसा जपण्याबरोबरच त्याचे संवर्धन करणे आवश्यक आहे. त्या दृष्टीने मराठी भाषा गौरव दिनानिमित्त विद्यापीठाच्या मराठी विभागातर्फे आयोजित विशेष लोककला महोत्सव स्तुत्य आहे, असे गौरवोद्‌गार शिवाजी विद्यापीठाचे कुलगुरू डॉ. देवानंद शिंदे यांनी आज येथे काढले.**

शिवाजी विद्यापीठाच्या मराठी अधिविभागातर्फे मराठी भाषा गौरव दिनानिमित्त 'लोकसाहित्य: उत्सव मराठीचा' या लोककला महोत्सवाचे आयोजन वि.स.खांडेकर भाषा भवन सभागृहात केले आहे. त्याच्या उद्‌घाटनावेळी ते बोलत होते. प्र-कुलगुरू डॉ. डी.टी. शिर्के यांची प्रमुख उपस्थिती होती.

कुलगुरू डॉ. शिंदे म्हणाले, ''प्रमाण भाषेचे अवडंबर माजविताना बोली भाषा, लोकभाषा, मातृभाषा यांकडे संकुचित पध्दतीने पाहिले जाते. हा संकुचित दृष्टिकोन दूर करणे आवश्यक आहे. महाराष्ट्रातील लोककलेला व्यापक स्वरूप प्राप्त होण्यासाठी सर्वांनी मिळून प्रयत्न केले पाहिजेत. मातृभाषेचे जतन करण्यासाठी सातत्याने प्रयत्नशील असणे गरजेचे आहे.''



**कोल्हापूर : शिवाजी विद्यापीठातील लोककला महोत्सवात धनगरी ओव्या सादर करताना कुरळप येथील बिरदेव भैरूसिद्ध ओवीकार मंडळाचे लोककलाकार.**

प्र-कुलगुरू डॉ. डी.टी. शिर्के म्हणाले, ''आपल्या संस्कृतीचा ठेवा असलेल्या कलाविष्कारांचा काळाबरोबर ऱ्हास होऊ नये. सोशल मीडियाच्या काळामध्ये या कलाविष्कारांचे जतन करण्यासाठी त्यांचे स्वरुप बदलण्याचा प्रयत्न करणे गरजेचे आहे.

सुरवातीला कवी कुसुमाग्रज आणि सरोजिनी बाबर यांच्या प्रतिमांचे पूजन केले. या वेळी चित्रकार भास्कर हांडे यांनी अक्षरचित्र रेखाटन केलेल्या प्रतिमेचे अनावरण कुलगुरू डॉ.शिंदे यांच्या हस्ते झाले.

### लोकगीतांतून प्रबोधन

'मोजता येत नाही जगाच्या मापानं...एवढं प्रेम दिले माझ्या आई-बापानं....' असे विविध संदेश धनगरी ओव्यांसह विविध लोकगीतांतून देण्यात आले. नशामुक्तीबरोबरच स्त्रीभ्रूण हत्या, महिला अत्याचार अशा विविध सामाजिक प्रश्नांवरही भाष्य झाले.

दरम्यान, या लोककला महोत्सवात जात्यावरील ओव्या, धनगरी ओव्या, गजनृत्य, गण-गवळण, लावणी व बैठकीची लावणी, भेदिक शाहिरी, राष्ट्रीय शाहिरी, झिम्मा फुगडी, पोतराज, वासुदेव यांचे वैविध्यपूर्ण पद्धतीने सादरीकरण करण्यात आले.

मराठी अधिविभागप्रमुख डॉ.रणधीर शिंदे यांनी स्वागत केले. डॉ. नंदकुमार मोरे यांनी आभार मानले.

या वेळी संगीत व नाट्यशास्त्र अधिविभागप्रमुख डॉ.अंजली निगवेकर, विदेशी भाषा अधिविभागप्रमुख डॉ. मेघा पानसरे, साहित्यिक किरण गुरव आदी उपस्थित होते.

# बालवर्तनाबाबत नव्याने संशोधन व्हावे

## न्यायमूर्ती पंकज देशपांडे; 'बाल न्याय अधिनियम- २०१५ व दत्तक कायदा'वर कार्यशाळा

**सकाळ वृत्तसेवा**

**कोल्हापूर, ता. २६ : 'बालकांकडून होत असलेल्या गुन्हेगारीच्या स्वरूपात बदल घडून येत असून, आता त्यात लैंगिक गुन्हेगारीचाही समावेश झाला आहे. बालकांमध्ये होत असलेल्या या लैंगिक गुन्हेगारीसाठी सहज उपलब्ध असणारे मोबाईल तंत्रज्ञान कारणीभूत असून, ही गोष्ट अत्यंत चिंताजनक आहे. त्यामुळे मुलांच्या वर्तनातील हा बदल समजून घेण्यासाठी नव्याने संशोधन होणे आवश्यक आहे,' असे मत न्यायमूर्ती पंकज देशपांडे यांनी व्यक्त केले.**



**कोल्हापूर : शिवाजी विद्यापीठातील कार्यशाळेत बोलताना न्यायमूर्ती पंकज देशपांडे.**



शिवाजी विद्यापीठाच्या मानव्यशास्त्र सभागृहामध्ये 'बाल न्याय (मुलांची काळजी व संरक्षण) अधिनियम-२०१५ व दत्तक कायदा' यावर एकदिवसीय कार्यशाळा झाली. जिल्हा महिला व बाल विकास अधिकारी, जिल्हा बाल संरक्षण कक्ष, सामाजिक वंचितता व समावेशक धोरण अभ्यास केंद्र, शिवाजी विद्यापीठातर्फे आयोजन केले. प्रा. डॉ. जगन कराडे या वेळी अध्यक्षस्थानी होते.

न्यायमूर्ती देशपांडे म्हणाले, ''बालकांमध्ये वाढत जाणारी गुन्हेगारी प्रवृत्ती कायदा करून संपणार नाही, तर त्यासाठी समाजमन बदलणे आवश्यक आहे. त्यासाठी दीर्घकालीन नियोजनाची आवश्यकता आहे. मुलांमधील कायद्याची, शिक्षेची भीती नाहीसी होत आहे. या गोष्टीचे दुष्परिणाम मर्यादित स्वरूपात नसून ते संपूर्ण देशपातळीवर होत आहेत. बालगुन्हेगारीमध्ये होत असलेल्या बदलांमुळे यंत्रणांपुढील आव्हानेही बदलत आहेत. या आव्हानांचा मुकाबला करण्यासाठी पूरक व्यवस्थाही निर्माण झाली पाहिजे.''

बाल कल्याण समितीचे सदस्य प्राचार्य डॉ. जे. के. पवार म्हणाले, ''छत्रपती शाहू महाराज यांनी आपल्या संस्थानामध्ये शंभर वर्षांपूर्वीच बालकांच्या संरक्षणासाठी कायद्याची निर्मिती केली होती. त्याच्या अंमलबजावणीसाठी आवश्यक असलेली आर्थिक तरतूदही केली होती. १९२० मध्ये शाहू महाराजांनी अनाथ मुलांच्या पुनर्वसनासाठी अल्बर्ट एडवर्ड हॉस्पिटल म्हणजे आताच्या सीपीआरमध्ये सुविधा केलेली होती. दुष्काळग्रस्त कामगारांच्या मुलांसाठी पाळणाघरांची निर्मिती केली होती. बालकांच्या विवाहास प्रतिबंध केला होता.'' दुसऱ्या सत्रामध्ये डॉ. सतीश के. पाटील यांनी 'बाल न्याय (मुलांची काळजी व संरक्षण) अधिनियम-२०१५' यावर मांडणी केली. सत्राध्यक्ष म्हणून डॉ. पवार होते. तिसऱ्या सत्रामध्ये दिलशान मुजावर यांनी दत्तक कायदा यावर विचार मांडले.

व्ही. बी. शेटे सत्राध्यक्ष होते. डॉ. प्रियदर्शिनी चोरगे यांनी बालन्याय मंडळाची भूमिका यावर विचार मांडले. डॉ. सतीश के. पाटील, व्ही. बी. शेटे, कांचन अंगडी, संजय देशपांडे, अतुल देसाई, डॉ. प्रल्हाद माने आदी उपस्थित होते. बी. जी. काटकर यांनी स्वागत केले. अविनाश भाले यांनी सूत्रसंचालन केले.

Balasaheb.Patil
@timesgroup.com
Tweet : BalpatilMT

# समृद्ध ४० लोककला झाल्या कॅमेराबद्ध

## शिवाजी विद्यापीठाने केले लोककलांचे चित्रीकरण

कोल्हापूर : शेकडो वर्षांची परंपरा असलेल्या लोककला लोप पावत आहेत. दूरचित्रवाणी आणि सोशल मीडियाच्या जाळ्यामुळे त्यांचे अस्तित्व नष्ट होते की काय, अशी भीती व्यक्त केली जातेय. मात्र, शिवाजी विद्यापीठाने गेली दोन वर्षे केलेल्या अभ्यासात कोल्हापूर, सांगली आणि साताऱ्यातील लोककलांची समृद्ध परंपरा तेवढ्याच जोमाने पुढे सुरू आहे. शिवाय या लोककलांबाबत उच्चशिक्षित तरुणांमध्ये भान आल्याचे नमूद केले आहे. डॉ. नंदकुमार मोरे यांच्या नेतृत्वाखाली सुरू असलेल्या प्रकल्पांतर्गत जवळपास ४० लोककलांचे चित्रिकरण केले आहे. या प्रकल्पामुळे दुर्मिळ कलाप्रकारांचे जतन होण्यास हातभार लागणार आहे.



शिवाजी विद्यापीठाच्यावतीने संकलित करण्यात आलेल्या लोककला प्रकारातील गजनृत्य.

राज्य सांस्कृतिक कार्य संचालनालयाने लोककलांच्या संकलनाचे काम हाती घेतले आहे. त्याअंतर्गत विद्यापीठ कार्यक्षेत्रातील तीन जिल्ह्यांत शेकडो वर्षांपासून जतन केलेल्या लोककलांचे संकलन मराठी विभागातील सहयोगी प्रा. डॉ. नंदकुमार मोरे यांच्या नेतृत्वाखाली सुरू आहे. सोशल मीडियाचे जाळे घट्ट होत असताना लोककलांबाबत काहीशा निराशेने बोलले जाते. मात्र, विद्यापीठाच्या टीमने केलेल्या संकलनानंतर सकारात्मक बाबी समोर आल्या आहेत. आजही ग्रामीण भागात लोककला जिवंत ठेवण्याचे काम तरुण करत आहेत. यात उच्चशिक्षित तरुणांचे प्रमाण जास्त आहे.

केवळ चित्रीकरणासाठी या कलांचे आयोजन केले जात नाही. डॉ. मोरे यांच्यासह पीएचडीसाठी संशोधन करणारे व पीएचडी झालेले काही विद्यार्थी या संकलनासाठी धडपडत आहेत. डॉ. सयाजीराव गायकवाड, राजेश पाटील, तेजस चव्हाण, आप्पासाहेब बुडके, संदीप बुंगारे, अमर सकटे, विनायक सरदेसाई, रवी धोंडे या विद्यार्थ्यांची टीम ज्या गावी लोककलांचे सादरीकरण असेल तेथे जाते. गगनबावड्यापासून माणदेशापर्यंत ही टीम प्रवास करत आहे. चित्रिकरणानिमित्त शोध घेत असताना लोककला जिवंत असल्याचे समोर आले. यात चंदगड भागातील शिमग्यातील खेळे, आष्टा भागातील कबीरपंथी भजने, एकतारी भजने, धनगरांच्या वैशिष्ट्यपूर्ण ओव्या, कृषीगीते, गडहिंग्लज भागातील करबल नृत्य, हेडाम, डहाकविधीची गीते चित्रित केली आहेत.

चित्रीकरणासाठी टीमने ६० ते ७० गावांना भेटी दिल्या. माणदेश, म्हसवड परिसर, सांगलीतील बुधगाव, जत, विटा, मायणी, राधानगरी, गारगोटीतील शेणगाव, चंदगड, गगनबावड्यातील अनेक दुर्गम भागात जाऊन चित्रिकरण केले.

### चित्रीकरण करण्यात आलेले कलाप्रकार

गोंधळ, भारूड, जागरण, भराड, पोतराज, शाहिरी, बहुरूपी, पिंगळा, वासुदेव, सोंगी भजन, धनगरी नृत्य, वादन, जोगवा, सिंग, सदई, हलगी वादन, जात्यावरच्या ओव्या, शेतात काम करत असताना पुरुष म्हणणारी गीते, सण उत्सवांतील स्त्रियांची गाणी, नंदीबैलवाला, माकडवाला, डवरी, बहुरुपी, कडकलक्ष्मी, शिमग्यातील सोंग, गौरी - गणपतीची गाणी, दिवाळी - हादग्याची गीते, गोंधळी, वाघ्यामुरळी, कोल्हाट्यांचे खेळ, भंडारा, जोगता, नमन-खेळे, गजी, फुगडी आदी.

### तमाशाला विकृत स्वरूप

तमाशा हा महराष्ट्रातील समृद्ध लोककला प्रकार होता. सध्या विविध गावांतील जत्रांमध्ये तमाशाचे आयोजन केले जाते. मात्र, यांत हिडीस अंगविक्षेप करून मूळ कलाप्रकाराला विकृतीकडे नेण्याचा प्रकार सुरू आहे. केवळ अश्लील विनोद आणि उडत्या चालीच्या गाण्यांवरील नृत्य म्हणजे तमाशा असा समज पसरवला जात आहे. त्यामुळे परंपरेने चालत आलेल्या तमाशाच्या चित्रिकरणासाठी विद्यापीठाची टीम गावोगावी फिरत आहे.

**सांगली, कोल्हापुरात लोककलांची समृद्ध परंपरा जपली जात असल्याचे समाधानकारक चित्र आहे. उच्चशिक्षित तरुण या कला जोपासत आहेत. अनेक दुर्मिळ कलाप्रकार त्या त्या ठिकाणी जाऊन त्यांच्या वेळेनुसार चित्रित केले. सरकारी पातळीवरही हे काम समाधानकारक आहे. शिवाजी विद्यापीठानेही पुढाकार घेतल्याने हा प्रकल्प मैलाचा दगड ठरेल.**

– डॉ. नंदकुमार मोरे, प्रकल्प प्रमुख

# लाभले आम्हास भाग्य बोलतो मराठी



कोल्हापूर टाइम्स टीम

**मराठी भाषा बोलणारे जोपर्यंत आहेत, तोपर्यंत मराठी भाषेच्या अस्तित्वाचा प्रश्नच उपस्थित होत नाही. राज्याबाहेरही मराठी भाषिक अभिमानाने मराठीचा झेंडा फडकवत आहेत. सोशल मीडियातही मराठीचा डंका सुरू आहे. डिजिटल माध्यमातून तरुणाईचे वाचन वाढत आहे. गावांप्रमाणे मोठ्या शहरांनीही दैनंदिन व्यवहारात मराठीचा वापर वाढविल्यास राज्याबाहेरही याचा विस्तार शक्य आहे. मराठी साहित्याचा अन्य भाषांमध्ये अनुवाद वाढविणे, सरकारी पातळीवरून भाषेच्या वापरास प्रोत्साहन देणे, मराठीला ज्ञान भाषा बनवणे आणि भाषेतील रोजगारनिर्मितीसाठी प्राधान्य दिल्यास अमृताशी पैजा जिंकणारी मराठी अटकेपार झेंडे लावू शकते, असा विश्वास शिवाजी विद्यापीठातील मराठी विभागात आयोजित केलेल्या चर्चासत्रात विद्यार्थ्यांनी व्यक्त केला**



अर्जुन टाकळकर

शिवाजी विद्यापीठातील मराठी विभागात आयोजित केलेल्या परिसंवादात विद्यार्थ्यांनी भाषेच्या सद्य:स्थितीबद्दल मते व्यक्त केली. यावेळी उपस्थित प्रा. सयाजी गायकवाड, प्रा. लक्ष्मण साठे, डॉ. संजय चोपडे, अशोक पाटील यांच्यासह भाषा विभागातील विद्यार्थी व संशोधक.

## विद्यापीठातील परिसंवादात भाषेबद्दल विद्यार्थी, संशोधक आश्वासक

'माझा मराठीचा बोल कौतुके परी अमृतातेही पैजा जिंके, ऐसी अक्षरे रसिके मेळविन,' असा विश्वास व्यक्त करणारी संत ज्ञानेश्वरांची मराठी जागतिकीकरणाच्या रेट्यात अनेक चढ-उतारांचा सामना करीत आहे. सामाजिक, सांस्कृतिक स्थित्यंतरे, आणि देश-विदेशातील भाषांचा प्रभाव स्वीकारूनही मराठीने आपला बाणा जपला आहे. मराठी भाषा गौरव दिनाच्या निमित्ताने 'महाराष्ट्र टाइम्स'ने शिवाजी विद्यापीठात मराठी विभागातील विद्यार्थ्यांशी संवाद साधला. भाषेची सद्यःस्थिती, भाषा संवर्धनासाठी सरकारकडून होणारे प्रयत्न, अन्य भाषांचा प्रभाव, मराठी भाषिकांची मानसिकता, शालेय आणि महाविद्यालयीन स्तरावरील अभ्यासक्रमांबाबत विद्यार्थ्यांनी उत्स्फूर्त भावना व्यक्त केल्या.

▶ **राहुल गवस :** मराठी भाषेने परकीय भाषांमधील अनेक शब्द स्वीकारूनही मराठीपण कायम जपले आहे. परकीय शब्दांचे मराठीकरण करून आपल्या भाषेची शब्दसंपदा वाढत आहे. मराठी लोकांच्या आर्थिकस्तरासोबतच भाषेचाही प्रभाव वाढत आहे. सरकारी कामकाजात मराठीचा वापर बंधनकारक करावा.

▶ **राजेश पाटील :** काही वर्षांपूर्वी प्रादेशिक बोलीभाषांच्या वापराबद्दल न्यूनगंड होता. मात्र, बोलींमध्ये मराठीचे भाषेचे खरे सौंदर्य असल्याचे लक्षात आल्याने चित्रपट, टीव्ही मालिका आणि सोशल मीडियातही बोलींचा वापर वाढत आहे. बोलीमधील साहित्यनिर्मितीलाही चांगले दिवस आहेत. बोलींमुळे प्रमाण भाषा अधिक समृद्ध होण्यास मदत होते. बोलींच्या वापरामुळे नव्याने लिहिणाऱ्या तरुणांना प्रोत्साहन मिळते. यातून समृद्ध वाङ्मयनिर्मितीला चालना मिळत आहे.

▶ **सुस्मिता कुटाळे :** ज्ञानभाषा म्हणून मराठीचा वापर वाढला पाहिजे. सर्व अभ्यास शाखांसाठी आवश्यक असणारे संदर्भग्रंथ मराठीत उपलब्ध असावेत. सरकारने यासाठी पुढाकार घेणे गरजेचे आहे. विद्यापीठांकडे हे काम सोपवता येईल.

▶ **ऋणाली नांद्रेकर :** पुणे, मुंबई किंवा राज्याबाहेर जाताच मराठी माणूस हिंदीतून बोलायला लागतो. आपल्याकडे आलेल्या परप्रांतीयांशीही आपण मराठीत बोलत नाही. त्यांना इथे राहायचे असेल तर मराठी शिकतील. आपली भाषा वापरणे आपणच टाळतो. आपल्याच भाषेबद्दल असलेला न्यूनगंड योग्य नाही. मराठीचा वापर हिरीरीने करायला हवा.

▶ **नंदकुमार कुंभार :** भाषा ही उपजीविकेचे साधन बनावी. मराठी विषयातून बीएड्, डीएड्, पीएचडी करणारे विद्यार्थी बेरोजगार असतील तर भाषेचा अभिमान कसा वाढेल? सरकारने सर्व शाळांमध्ये मराठी विषय सक्तीचा करून तो शिकविण्यासाठी स्वतंत्र शिक्षकांची नियुक्ती करावी. पत्रकारिता, जाहिरात, प्रबोधनाच्या क्षेत्रात मराठीच्या विद्यार्थ्यांना प्राधान्य मिळावे.

▶ **विनायक सरदेसाई :** भाषेविषयी सरकारच्या धोरणांमध्ये सुधारणा होण्याची गरज आहे. मराठी शाळांना अनुदान दिले जात नाही.शिक्षकभरतीकडे दुर्लक्ष आहे. मराठी भाषेला अभिजात भाषेचा दर्जा मिळावा, यासाठी गतीने प्रयत्न नाहीत. सरकारने पुढाकार घेऊन मराठीला चालना द्यावी.

डॉ. सयाजीराव गायकवाड, प्रा. लक्ष्मण साठे, अशोक पाटील, आर्दींनीही मराठी भाषेची सद्यःस्थिती आणि भवितव्याबद्दल मत व्यक्त केले. यावेळी मराठी विभागप्रमुख डॉ. रणधीर शिंदे यांच्यासह विद्यार्थी आणि संशोधक विद्यार्थी उपस्थित होते.

### सोशल मीडियाच्या माध्यमातून वाचन वाढले

ग्रंथालयांमध्ये विद्यार्थ्यांची गर्दी कमी असली तरी, सोशल मीडियाच्या माध्यमातून विद्यार्थ्यांचे वाचन वाढले आहे. ई-बुकचा वाढलेला वापर आणि सोशल मीडियातील वाढलेल्या वापरकर्त्यांच्या संख्येमुळे मराठी भाषेला भवितव्याची चिंता नाही. कालानुरूप वाचनाचे साधन बदलत आहे. मात्र, वाचकांच्या संख्येत घट होत नाही. उलट सोशल मीडियातून पुस्तकांची सहज उपलब्धता होत असल्याने विद्यार्थ्यांचा वाचनाचा आवाका वाढत असल्याची निरीक्षणे तज्ज्ञ नोंदवत आहेत.



# किचन गार्डन प्रशिक्षण वर्ग उद्यापासून

लोकमत न्यूज नेटवर्क

कोल्हापूर : शिवाजी विद्यापीठातील लोकविकास केंद्रामार्फत शुक्रवार २८ फेब्रुवारी ते २७ जून या कालावधीत प्रत्येक शुक्रवारी दुपारी एक ते तीन या वेळेत किचन गार्डन प्रशिक्षण वर्ग घेण्यात येणार आहे. लोकविकास केंद्रात होणाऱ्या वर्गामध्ये घरगुती कचऱ्याचे व्यवस्थापन, भाजीपाला व फळे यांची लागवड, टेरेस व बाल्कनी गार्डन, होम गार्डन, ग्राफटिंग, जैविक खते व जंतूनाशके, किचन गार्डनिंगचे प्रकार शिकविले जाणार आहेत. हा उपक्रम मोफत असून, त्यासाठी वय आणि शिक्षणाची कोणतीही अट नाही. इच्छुकांनी लाभ घ्यावा, असे आवाहन डॉ. मंजूषा देशपांडे यांनी केले आहे.

# शिवपरिक्रमा उत्साहात

## शिवाजी विद्यापीठातर्फे आयोजन

लोकमत न्यूज नेटवर्क

कोल्हापूर : शिवाजी विद्यापीठाच्या राष्ट्रीय सेवा योजनेतर्फे (एनएसएस) गडकोट किल्ले संवर्धन या उपक्रमांतर्गत दि. १६ ते २० फेब्रुवारी या कालावधीत किल्ले रायरेश्वर येथे विशेष श्रमसंस्कार शिबिर घेण्यात आले. त्यामध्ये २०० स्वयंसेवक सहभागी झाले. त्यांनी रायरेश्वर ते केंजळगड अशी शिवपरिक्रमा केली.

वाई येथील किसनवीर महाविद्यालय आणि विद्यापीठाच्या एनएसएस विभागातर्फे आयोजित शिबिरात सातारा, सांगली, कोल्हापूर जिल्हांतील विद्यार्थी स्वयंसेवक सहभागी झाले. शिबिराचे उद्घाटन कुलसचिव डॉ. विलास नांदवडेकर यांच्या हस्ते झाले.

यावेळी जनता शिक्षण संस्थेचे संचालक सुरेश यादव, ज्ञानदीप क्रेडिट सोसायटीचे अध्यक्ष व्ही. जी. पवार, प्राचार्य डॉ. आय. एफ. पैलवान, आदी उपस्थित होते. शिबिरात श्रमदानासह विविध व्याख्याने, स्पर्धा घेण्यात आली. शिबिराच्या शेवटच्या दिवशी सकाळी सात वाजता सर्व सहभागी स्वयंसेवकांनी कुलगुरु डॉ. देवानंद शिंदे यांच्यासमवेत शिवपरिक्रमा करण्यात आली. छत्रपती शिवाजी महाराजांचे व्यवस्थापन कौशल्य हे तत्कालीन परिस्थितीप्रमाणेच आजही तितकेच प्रेरणादायी असल्याचे डॉ. शिंदे यांनी सांगितले.

शिबिराचा समारोप जनता शिक्षण संस्थेचे सहसचिव प्रा. नारायण चौधरी यांच्या प्रमुख उपस्थितीत झाला. शिबिरासाठी आनंद घोरपडे, डॉ. राजेश गावित यांचे सहकार्य लाभले. या शिबिरासाठी अनेक शिबिरार्थी उपस्थीत होते.

### स्वयंसेवकांनी केला रस्ता

या शिबिरांतर्गत श्रमदान करुन स्वयंसेवकांनी रायरेश्वर येथे तयार केला. त्याचे उद्घाटन डॉ. शिंदे यांच्या हस्ते करण्यात आले. यावेळी डी. आर. मोरे, डी. के. गायकवाड, पी. टी. गायकवाड, अभय जायभाये, उपस्थित होते.

# शिवाजी विद्यापीठात साकारणार साहित्याचा इतिहास

म. टा. प्रतिनिधी, कोल्हापूर

शिवाजी विद्यापीठाच्या कार्यक्षेत्रातील कोल्हापूर, सांगली आणि सातारा या तीन जिल्ह्यातील साहित्याचा इतिहास विद्यापीठाच्या मराठी विभागात साकारणार आहे. 'साहित्य संग्रहालय' तयार करण्याचा प्रस्ताव मराठी विभागाने विद्यापीठ प्रशासनाकडे दिला असून, लवकरच याला मान्यता मिळण्याची शक्यता आहे. संग्रहालयामुळे तीन जिल्ह्यांतील साहित्याचा इतिहास एकाच ठिकाणी पाहण्याची संधी मिळणार आहे.

दक्षिण महाराष्ट्रातील कोल्हापूर, सांगली आणि सातारा या तिन्ही जिल्ह्यांचे साहित्यात मोठे योगदान आहे. पहिल्या संगीत मराठी नाटकाचा जन्म सांगलीत झाला. विष्णुदास भावे, कृष्णाजी प्रभाकर खाडीलकर हे मराठी नाट्यसृष्टीसाठी देणगीच ठरले. शाहीर पट्ठे बापूराव, अण्णा भाऊ साठे, वि. स. खांडेकर, व्यंकटेश माडगूळकर, ग. दि. माडगूळकर, शंकरराव खरात, शिवाजी सावंत, आनंद यादव, विश्वास पाटील, राजन गवस, कवी मर्ढेकर, पी. सावळाराम, सुधांशु अशा अनेक दिग्गजांची नामावली दक्षिण महाराष्ट्रात आहे. ग्रामीण, दलित, स्त्रीवादी, वैचारिक अशा सर्वच क्षेत्रात साहित्यिकांचे मोठे योगदान आहे. उज्ज्वल परंपरा लाभलेला दक्षिण महाराष्ट्रातील साहित्याचा इतिहास एकाच ठिकाणी पाहता यावा, यासाठी



## तीन जिल्ह्यांतील लेखकांच्या माहितीचे संग्रहालय होणार

शिवाजी विद्यापीठातील मराठी विभागाचे तत्कालीन विभागप्रमुख डॉ. राजन गवस यांनी साहित्य संग्रहालयाची संकल्पना मांडली. विभागात संग्रहालयाची निर्मिती व्हावी, यासाठी त्यांनी २०१८-१९ मध्ये विद्यापीठ प्रशासनाकडे प्रस्ताव सादर केला आहे.

साहित्य संग्रहालयात या सर्व लेखकांची प्रकाशित पुस्तके असतील. जुन्या काळातील महत्त्वाच्या लेखकांचे हस्तलिखित, पत्रव्यवहार, त्यांना मिळालेले सन्मान, पुरस्कार, जिल्हानिहाय लेखकांची यादी असेल. मराठी विभागातील निवृत्त प्राध्यापकांची ग्रंथसंपदा, विद्यापीठाच्या कार्यक्षेत्रातील मराठी विषयाच्या प्राध्यापकांची प्रकाशने, तीन जिल्ह्यातील लोकसाहित्य, लोकवाङ्मयही या संग्रहालयात असतील. जुन्या लेखकांचे हस्ताक्षर आणि दुर्मिळ फोटो हे संग्रहालयाचे खास आकर्षण असेल. तिन्ही जिल्ह्यांतील साहित्यिकांसह त्यांच्या नातेवाईकांना पुस्तके पाठवण्याचे आवाहन मराठी विभागाने केले आहे. यानुसार ग्रंथसंपदेसह आवश्यक माहिती मराठी विभागाकडे जमा होण्यास सुरुवात झाली आहे. विद्यापीठ प्रशासनाच्या मान्यतेनंतर तातडीने संग्रहालयाचे काम सुरू होणार असल्याची माहिती विभागातील प्रा. डॉ. नंदकुमार मोरे यांनी दिली.

### बोलींचेही असेल स्वतंत्र दालन

कोल्हापूर, सांगली आणि सातारा या जिल्ह्यांतील प्रादेशिक बोली भाषा स्वतःच्या गुणवैशिष्ट्यांसह आजही टिकून आहेत. कोल्हापुरातील चंदगडी, साताऱ्यातील माणदेशी याशिवाय सीमाभागातील मिश्र बोली भाषांचेही स्वतंत्र दालन असेल. बोलींचे साहित्यातील योगदान आणि तिच्या वैशिष्ट्यांचीही माहिती या संग्रहालयात मिळणार आहे.

"

साहित्य संग्रहालयामुळे तीन जिल्ह्यातील वाङ्मयीन इतिहासाची माहिती एकाच ठिकाणी मिळणार आहे. यातून मराठीचा अभ्यास करणारे विद्यार्थी आणि शिक्षकांना प्रोत्साहन मिळेल. इतिहासाचे जतन करून नव्याने लेखन करणाऱ्यांना प्रेरणा देणारा हा उपक्रम ठरेल.

– प्रा. डॉ. नंदकुमार मोरे,
मराठी विभाग, शिवाजी विद्यापीठ

# विद्यापीठात आज रोजगारनिर्मिती कार्यशाळा

कोल्हापूर : रोजगार निर्मितीला चालना मिळावी तसेच त्यातून ग्राहकांना साफ व सुरक्षित अन्न मिळावे या हेतूने शिवाजी विद्यापीठातर्फे अन्न सुरक्षा मित्र या योजनेची सुरुवात केली आहे. या योजनांची माहिती व त्याचा प्रसार व्हावा या हेतूने शिवाजी विद्यापीठाच्या अन्न तंत्रज्ञान विभागातर्फे २७ व २८ फेब्रुवारी या दिवशी कार्यशाळा आयोजित केली जात आहे. सकाळी ११ ते सायंकाळी पाच यावेळेत अन्नतंत्रज्ञान विभागात ही कार्यशाळा होणार आहे.

अन्न सुरक्षा व मानके प्राधिकरण हि भारतातील अन्न सुरक्षा व कायद्या संदर्भातील सर्वोच्च संस्था आहे. या संस्थेने भारतीय समाजामध्ये अन्न सुरक्षेबाबत जागृती निर्माण व्हावी यासाठी इट राइट कॅम्पस या उपक्रमाची सुरुवात केली आहे.

# काव्यसंग्रहाचे आज प्रकाशन

म. टा. प्रतिनिधी, कोल्हापूर

कवयित्री सुप्रिया आवारे यांच्या 'न बांधल्या जाणाऱ्या घरात' या काव्यसंग्रहाचे गुरुवारी (ता. २७) महावीर कॉलेज येथे प्रकाशन होणार आहे. कॉलेजच्या ॲम्पी थिएटरमध्ये दुपारी १२ वाजता कार्यक्रमाची सुरुवात होणार आहे.

प्रकाशन समारंभासाठी मुंबईतील ज्येष्ठ कवयित्री नीरजा प्रमुख उपस्थित राहणार आहेत. कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी संस्थेच्या संचालिका डॉ. सुषमा रोटे आहेत.

नव्या पिढीतील कवयित्री सुप्रिया आवारे यांचा 'न बांधल्या जाणाऱ्या घरात' हा कवितासंग्रह गाजियाबाद (दिल्ली) येथील कॉपर कॉईन पब्लिकेशनने तयार केला आहे. समकालातील स्व अस्तित्वाचा शोध घेणारी ही कविता आहे. प्रकाशन समारंभात शिवाजी विद्यापीठाचे मराठी विभाग प्रमुख डॉ. रणधीर शिंदे हे काव्यसंग्रहावर भाष्य करणार आहेत.

# मराठीमधील संशोधनात शिवाजी विद्यापीठाचा झेंडा

म. टा. प्रतिनिधी, कोल्हापूर

शिवाजी विद्यापीठाच्या मराठी विभागातून आजवर २१० विद्यार्थ्यांनी संशोधन करून पी.एचडी. पदवी प्राप्त केली. मराठी भाषा आणि साहित्यामध्ये राज्यातील अन्य विद्यापीठांच्या तुलनेत शिवाजी विद्यापीठ आघाडीवर असुन, या संशोधनांनी दर्जा सिद्ध केला आहे. यामुळेच विद्यापीठातील मराठी विभागाला विद्यापीठ अनुदान आयोगासह राज्य सरकारकडून संशोधनासाठी एक कोटीचा निधी मिळाला आहे.

शिवाजी विद्यापीठाची स्थापना १९६२ मध्ये झाली. विद्यापीठात मराठी विभाग ३ मार्च १९७९ मध्ये सुरू झाला. तत्पूर्वी कोल्हापूर, सांगली, सातारा येथील काही प्रमुख महाविद्यालयांमध्ये मराठी विषयाचे अध्यापन केले जात होते. विद्यापीठात मराठी विभागाची निर्मिती होताच गो. मा. पवार यांनी विभागप्रमुख पदाची जबाबदारी स्वीकरली. सुरुवातीच्या काळात डॉ. ल. रा. नसिराबादकर, रमेश धावरे, प्रभाकर पाटील आदींचे योगदान महत्त्वाचे ठरले. यानंतर डॉ. विश्वनाथ शिंदे, डॉ. रवींद्र ठाकूर, डॉ. कृष्णात किरवले, डॉ. राजन गवस यांच्या नेतृत्वाखाली मराठी विभाग कार्यरत होते. गेल्या ४१ वर्षांत मराठी विभागातून २१० जणांनी संशोधन करून पी.एचडी. पदवी प्राप्त केली. यात सूर्यकांत खांडेकर यांचे 'शाहिरी पोवाडा', डॉ. राजन गवस यांची 'भाऊ पाध्ये यांचे साहित्य', डॉ. वासुदेव सावंत यांचे 'कोसला कलाकृतीचा सखोल अभ्यास' हे शोधप्रबंध विशेष ठरले आहेत.

सुरुवातीच्या काळात प्राचीन, अर्वाचिन आणि मध्ययुगीन साहित्याचे संशोधन झाले. १९९० नंतर समकालीन आणि आधुनिक साहित्याचा अभ्यास करण्याकडे कल वाढला. अलीकडे वैचारिक आणि तुलनात्मक अभ्यास करण्यास प्राधान्य दिले जात आहे. पा. ना. कुलकर्णी, ल. रा. नसिराबादकर, वसंत जोशी, बापू गिंडे, ल. रा. मंचर, निर्मलकुमार फडकुले आदींनी प्राचीन, मध्ययुगीन साहित्याचा सखोल अभ्यास करून पुष्कळ ग्रंथसंपदा निर्माण केली. शिवाजीराव चव्हाण, भगवंतराव देशमुख, विश्वनाथ शिंदे आदींनी संशोधनातून लोकसाहित्याचे विश्व उलगडले. गो. मा. पोवार, म. द. हातकणंगलेकर, निर्मलकुमार फडकुले आदींनी वैचारिक साहित्याचे संशोधन करून मराठीतील संशोधनाची व्याप्ती वाढवली. साहित्याचा सामाजिक आणि सांस्कृतिक दृष्टिकोनातून अभ्यास करण्याची शास्त्रीय पद्धत शिवाजी विद्यापीठाच्या मराठी विभागानेच विकसित केली. साहित्यासह भाषाविज्ञान, समीक्षा आणि तौलनिक अभ्यासाकडेही संशोधक विद्यार्थ्यांचा कल आहे.

पी.एचडी.सह एम.फील. आणि विशेष संशोधनातही मराठी विभाग आघाडीवर आहे. विभागातून १४० विद्यार्थ्यांनी एम.फील. पदवी घेतली. गेल्या तीन-चार वर्षांपासून विभागातील प्राध्यापक दहा विषयांवर संशोधन करीत होते. यातील बहुतांश संशोधन निबंध पूर्ण झाले आहेत. विद्यापीठ अनुदान आयोग, राज्य सरकार आणि शिवाजी विद्यापीठाने या संशोधनांसाठी सुमारे एक कोटीचा निधी दिला आहे. संशोधनातून अनेक महत्त्वाचे संदर्भ ग्रंथ तयार झाले असून, त्यांचा उपयोग सर्व विद्यापीठांमधील विद्यार्थ्यांना होत आहे. संशोधनातील शास्त्रीय पद्धती आणि दर्जा यामुळे मराठी विभागातील संशोधन साहित्याने मराठी भाषा समृद्ध करण्यास हातभार लावला.

**२१०**
विभागातील पी.एचडी.

**१४०**
विभागातील एम.फील.

**300**
विभागातील 'सेट', 'नेट'धारक

**१५**
सारथी शिष्यवृत्तीधारक






> संशोधनात मराठी विभागाने मोलाचे योगदान दिले आहे. सुरुवातीच्या काळात हस्तलिखितात सादर केलेले संशोधन प्रबंधही विद्यापीठाकडे आहेत. संशोधनातून तयार झालेल्या ग्रंथांनी मराठी भाषेच्या संवर्धनाचे काम केले. याशिवाय अनेक चौकटीबाहेरच्या विषयांनी सामाजिक सुधारणांसाठीही मदत केली.
>
> डॉ. रणधीर शिंदे विभाग प्रमुख, मराठी भाषा विभाग

### महत्त्वाची संशोधने

**डॉ. राजन गवस**

- अंधश्रद्धेच्या भाषिक व्यवस्थेचा शोध
- महाराष्ट्राचे वाङ्मय महर्षी कृष्णराव अर्जुन केळुसकर यांचे समग्र वाङ्मय

**डॉ. रणधीर शिंदे**

- मराठी संत कवितेवरील बौद्ध तत्त्वज्ञानाचा प्रभाव
- महर्षी विठ्ठल रामजी शिंदे समग्र वाङ्मय
- ग. दि. माडगूळकर जन्मशताब्दी ग्रंथ
- महर्षी विठ्ठल रामजी शिंदे यांचे अप्रकाशित वाङ्मय
- डॉ. नंदकुमार मोरे
- चंदगडी बोली : इतिहास आणि भूगोल
- मराठी संस्थानांचा इतिहास
- तंजावर मराठी राज्याचे भाषिक आणि वाङ्मयीन कार्य

# उद्या रंगणार शिवमहोत्सव

## 'विवेकानंद'ला 'शिव जीवनगौरव' पुरस्कार

कोल्हापूर टाइम्स टीम

शिवाजी विद्यापीठातील आजी माजी विद्यार्थ्यांच्या संघटनातून गेली १५ वर्षे कोल्हापूरच्या प्रबोधनपर सांस्कृतिक जीवनाचा अविभाज्य घटक बनलेला शिव-महोत्सव शुक्रवारी (दि. २८ फेब्रुवारी) सायंकाळी ४ वाजता शिवाजी विद्यापीठाच्या राजमाता जिजाऊसाहेब सभागृहात आयोजित करण्यात आला आहे. या महोत्सवात कोल्हापूर येथील श्री स्वामी विवेकानंद शिक्षणसंस्थेला 'शिव-जीवन गौरव' पुरस्कार देऊन गौरविण्यात येणार आहे. या वेळी इतरही शिवपुरस्कार प्रदान

करण्यात येणार आहेत. तसेच, दरवर्षीप्रमाणे भरगच्च सांस्कृतिक कार्यक्रम होणार आहेत, अशी माहिती महोत्सवाचे संस्थापक अध्यक्ष डॉ. प्रवीण कोडोलीकर यांनी दिली.

यंदाच्या शिवमहोत्सवाचे मुख्य आकर्षण ह. भ. प. निवृत्ती महाराज इंदोरीकर यांचा कीर्तन सोहळा असणार आहे. उपस्थितांनी येताना सोबत एक वही-पेन घेऊन यावे, ते महाराज चालवित असलेल्या आश्रमातील निराश्रित बालकांना देण्यात येईल, असे आवाहनही डॉ. कोडोलीकर यांनी केले आहे.

पुरस्कार वितरण समारंभानंतर सांस्कृतिक कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले आहे. 'मी होणार सुपरस्टार'फेम श्रावणी महाजन, 'अप्सरा आली' कार्यक्रमाची विजेती माधुरी पवार या नृत्य सादरीकरण करणार आहेत. गायिका पूजा गोटखिंडेकर-पाटील, मिमिक्री आर्टिस्ट बाहुबली राजमाने, त्याचबरोबर स्वास ॲकॅडमीतर्फे सुभेदार तान्हाजी मालुसरे यांच्या कार्यावर आधारित भव्य सादरीकरण होणार आहे. सँड आर्टिस्ट अमित माळकरी, ओंकार शेटे, विश्वविक्रमी नृत्य-दिग्दर्शक सागर बगाडे, चंद्रकांत पाटील, डॉ. सत्यजीत कोसंबी यांचाही या सांस्कृतिक कार्यक्रमात सक्रिय सहभाग असणार आहे.

कार्यक्रमास तंजावरचे प्रिन्स शिवाजीराजे टी. भोसले, खासदार संजय मंडलिक, अण्णासाहेब पाटील महामंडळाचे उपाध्यक्ष संजय पवार, पश्चिम महाराष्ट्र देवस्थान समितीचे सचिव विजय पोवार, डॉ. विजयकुमार माने, शिवाजी विद्यापीठाचे कुलगुरू डॉ. देवानंद शिंदे, प्र-कुलगुरू डॉ. डी. टी. शिर्के, कुलसचिव डॉ. विलास नांदवडेकर, राजाराम महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. अण्णासाहेब खेमणार, विभागीय सहसंचालक डॉ. अशोक उबाळे, प्राचार्य डॉ. अभयकुमार साळुंखे यांची प्रमुख उपस्थिती असणार आहे.

# विद्यापीठात लोककला महोत्सवास प्रारंभ

## रंगणार आज उत्सव माय मराठीचा

कोल्हापूर टाइम्स टीम

मराठी भाषा गौरव दिनानिमित्त २६ व २७ फेब्रुवारी रोजी शिवाजी विद्यापीठाच्या मराठी विभागामार्फत 'लोकसाहित्य : उत्सव मराठीचा' हा लोकसाहित्याशी निगडित कार्यक्रम आयोजित केला आहे. राज्य सरकारच्या पुढाकाराने होणाऱ्या या महोत्सवास वि. स. खांडेकर भाषा भवन येथे बुधवारपासून सुरुवात झाली. शिवाजी विद्यापीठाचे कुलगुरू प्रा. डॉ. देवानंद शिंदे यांच्या हस्ते आणि प्र-कुलगुरू प्रा. डॉ. डी. टी. शिर्के यांच्या उपस्थितीत महोत्सवाचे उद्घाटन झाले.

बुधवारी दुपारी १२ वाजता लोककला महोत्सवात जात्यावरील ओव्या (सावित्रीबाई लोककला पथक, धंदवडे), धनगरी ओव्या (बिरदेव भैरसिद्ध ओवीकार मंडळ, कुरळप), गजनृत्य (विरोब गजनृत्य वागूल मंडळ, आरेवाडी), गणगवळण (शाहीर सुरेश कांडगावकर आणि सहकारी), लावणी आणि बैठकीची लावणी (सुनीता कांडगावकर आणि सहकारी), भेदिक शाहिरी (शाहीर हिंदुराव पाटील आणि सहकारी), राष्ट्रीय शाहिरी (शाहीर रंगराव पाटील आणि सहकारी), झिम्मा-फुगडी (जिजाऊ लोककला व लेझीम पथक, धुंदवडे), पोतराज (अंकुश कसबे), वासुदेव (रणवीर वासुदेव) हे कलाप्रकार सादर करण्यात आले.

तर २७ फेब्रुवारी रोजी 'उत्सव माय मराठीचा' हा मराठी लोकगीतांचा सांगीतिक कार्यक्रम आणि 'रेडिसो बटाटा' ही लघुनाटिका शिवाजी विद्यापीठाच्या संगीत व नाट्यशास्त्र विभागामार्फत सादर केली जाणार आहे.



# 'राष्ट्रीय विज्ञान सप्ताहा'ला प्रारंभ

**कोल्हापूर : पुढारी वृत्तसेवा**

शिवाजी विद्यापीठातील प्राणीशास्त्र विभाग आयोजित 'राष्ट्रीय विज्ञान सप्ताहा'ला बुधवारी प्रारंभ झाला. शास्त्रज्ञ डॉ. कृष्णमेघ कुंटे यांच्या हस्ते व विज्ञान व तंत्रज्ञान अधिशाखेचे अधिष्ठता डॉ. पी. एस. पाटील यांच्या अध्यक्षतेखाली व वित्त व लेखाअधिकारी व्ही. टी. पाटील यांच्या उपस्थितीत हा कार्यक्रम झाला.

समन्वयक डॉ. एम. व्ही. वाळवेकर म्हणाल्या, मेरी कुरी यांनी भौतिक शास्त्रात मोलाचे योगदान दिले आहे. संयोजक डॉ. व्ही. एस. मन्ने यांनी विविध कार्यक्रमांची माहिती दिली. शुक्रवारी सकाळी जागतिक तापमान वाढीचे पृथ्वीवरील परिणाम या विषावर 'विज्ञान फेरी'चे 'शिवाजी विद्यापीठ ते दसरा चौक' असे आयोजन केले असल्याचेही त्यांनी सांगितले. डॉ. एम. पी. भिलावे यांनी आभार मानले.

जनसंपर्क कक्ष
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर

27 FEB 2020
तरूण भारत

# शिवाजी विद्यापीठात उद्या किचन गार्डन प्रशिक्षण वर्ग

प्रतिनिधी
कोल्हापूर

शिवाजी विद्यापीठातील लोकविकास केंद्राच्या वतीने सोळा आठवडे कालावधीचा किचन गार्डन प्रशिक्षण वर्ग सुरु होणार आहे. शुक्रवार (२८ फेब्रुवारी) रोजी या प्रशिक्षण वर्गास प्रारंभ होणार आहे.

२६ जूनपर्यंत हा वर्ग सुरु राहणार आहे. प्रत्येक शुक्रवारी १ ते ३ यावेळेत लोकविकास केंद्र येथे हे प्रशिक्षण वर्ग भरविण्यात येणार आहेत.



यामध्ये घरगुती कचऱ्याचे व्यवस्थापन, भाजीपाला व फळे यांची लागवड, टेरेस व बाल्कनी गार्डन, होम गार्डन, ग्राफटींग तसेच जैविक खते व जंतूनाशके, किचन गार्डनिंगचे विविध प्रकार शिकवले जाणार आहेत. पूर्णपणे मोफत असणाऱ्या या प्रशिक्षण वर्गास वयाची व शिक्षणाची अट नाही. कृपया इच्छुकांनी याचा लाभ घ्यावा असे आवाहन लोकविकास केंद्रातर्फे करण्यात आले आहे.

# ‘संजीवन अभियांत्रिकी’ला विजेतेपद

## शिवाजी विद्यापीठअंतर्गत लीड कॉलेज व्हॉलीबॉल स्पर्धा उत्साहात

**पुनाळ : पुढारी वृत्तसेवा**

शिवाजी विद्यापीठांतर्गत लीड कॉलेज आयोजित व्हॉलीबॉल स्पर्धा संजीवन अभियांत्रिकी महाविद्यालय, पन्हाळा येथे पार पडल्या. यामध्ये संजीवन अभियांत्रिकी महाविद्यालयाच्या मुलांच्या व मुलींच्या दोन्ही संघांनी प्रथम क्रमांक पटकावले.

या स्पर्धेतील मुलांचा पहिला सामना नानासाहेब महाडिक कॉलेज वि. संजीवन महाविद्यालय यांच्यात झाला. यामध्ये संजीवनने विजय मिळवत उपांत्य फेरीत प्रवेश केला.उपांत्य फेरीमध्ये अशोकराव माने कॉलेज वि. संजीवन अशी लढत झाली. यामध्ये संजीवन महाविद्यालयाने विजय संपादन करून अंतिम सामन्यांमध्ये धडक मारली.

अंतिम सामना संजीवन महाविद्यालय वि. संजय घोडावत अभियांत्रिकी महाविद्यालय



**पन्हाळा : संजीवनच्या दोन्ही विजयी संघास बक्षीस देताना आप्पासो पल्लखे, प्रा. रणजित इंगवले, सागर पाटील, विजय गव्हाणे व मान्यवर.**

यांच्यामध्ये झाला. या सामन्यामध्ये संजीवन अभियांत्रिकी महाविद्यालयाने प्रथम क्रमांक पटकावला.

या स्पर्धेतील मुलींचा पहिला सामना तात्यासाहेब कोरे कॉलेज वि. संजीवन महाविद्यालय यांच्यात झाला. यामध्ये संजीवनने विजय मिळवत अंतिम फेरीत प्रवेश केला. अंतिम सामना संजीवन महाविद्यालय वि. संजय घोडावत अभियांत्रिकी महाविद्यालय यांच्यामध्ये झाला. या सामन्यामध्ये संजीवन अभियांत्रिकीमहाविद्यालयाने प्रथम क्रमांक पटकावला. बक्षीस वितरण रणजित इंगवले, आप्पासो पल्लखे, सागर पाटील, विजय गव्हाणे यांच्या हस्ते करण्यात आले.

पंच म्हणून अबीद मोकाशी, नूरमुहमद नागरजी, नितीन बहादुरे, जयंत कुलकर्णी, कपिल खोत यांनी काम पहिले. स्पर्धा यशस्वी करण्यासाठी सौरभ भोसले, संग्राम पाटील, विजय पाटील व सागर पाटील यांनी सहकार्य केले. विजयी संघास क्रीडाशिक्षक प्रा. रणजित इंगवले यांचे मार्गदर्शन लाभले.

संजीवन अभियांत्रिकी महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. मोहन बी. वनरोट्टी, संजीवन ग्रुप ऑफ स्कूलचे चेअरमन पी. आर. भोसले, सहसचिव एन. आर. भोसले यांचे सहकार्य लाभले.

# बहारदार कलाविष्काराने 'कार्निव्हल'ची सांगता

**कोल्हापूर : पुढारी वृत्तसेवा**

विदेशी भाषांतील सुरेल गीते, समूह गीते, युद्ध गीते, लोकनृत्य, नाट्य सादरीकरण या बहारदार कला आविष्काराने 'कार्निव्हल २०२०'ची सांगता झाली. शिवाजी विद्यापीठाच्या विदेशी भाषा विभागाच्या वतीने या कला, सांस्कृतिक महोत्सवाचे आयोजन केले होते.

'कार्निव्हल - २०२०' या कार्यक्रमाच्या दुसऱ्या दिवशी रशियन, जर्मन, जपानी व पोर्तुगीज भाषांतील विविधस्वरूपाचेखेळ,भाषिककौशल्य उपक्रम व सांस्कृतिक कार्यक्रम या माध्यमातून विद्यार्थ्यांनी कलाविष्कार सादर केले. यातून प्रेक्षकांना रशियन, जपानी, जर्मन व पोर्तुगीज संगीत व नृत्य, तसेच विविध उत्सवांद्वारे प्रकट होणारे त्यांचे जनजीवन यांचा परिचय झाला.



शिवाजी विद्यापीठातून...

हस्तलेखन स्पर्धेचे विजेते मैत्रेयी कुलकर्णी, साक्षी मेथे (रशियन), तनय कोळेकर (जर्मन ) व ज्योत्स्ना भाटवडेकर व दीपिका भोसले (जपानी) यांना सन्मानित करण्यात आले. यावेळी डॉ. मेघा पानसरे, स्नेहा वझे, स्नेहल शेट्ये, शीतल कुलकर्णी व प्रियांका माळकर यांनी मार्गदर्शन केले.

# शिवाजी विद्यापीठात उद्या शिवमहोत्सव

**कोल्हापूर (पुढारी वृत्तसेवा) :** शिवाजी विद्यापीठात शुक्रवारी (दि. २८) शिवमहोत्सवाचे आयोजन करण्यात आले आहे. दुपारी ४ वाजता शिवाजी विद्यापीठाच्या राजमाता जिजाऊसाहेब सभागृहात हा महोत्सव होणार आहे. महोत्सवात निवृत्ती महाराज इंदोरीकर यांचा कीर्तन सोहळा होणार आहे. महोत्सवात कोल्हापूर येथील स्वामी विवेकानंद शिक्षण संस्थेला शिव-जीवनगौरव पुरस्कार देऊन गौरविण्यात येणार आहे. यावेळी इतरही शिव पुरस्कार प्रदान करण्यात येणार आहेत. पुरस्कार वितरणानंतर सांस्कृतिक कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आल्याची माहिती आयोजक डॉ. प्रवीण कोडोलीकर यांनी दिली. महोत्सवाला येताना सोबत वही-पेन घेऊन यावे, ते महाराज चालवित असलेल्या आश्रमातील निराश्रित बालकांना देण्यात येणार असल्याचेही त्यांनी सांगितले.

# भू-अवकाशबाबत विद्यापीठात आज कार्यशाळा

**कोल्हापूर / प्रतिनिधी :**

शिवाजी विद्यापीठात गुरुवारी दि. २७ 'अर्थ अँड स्पेस सायन्स' या विषयावर एकदिवसीय कार्यशाळा व प्रशिक्षण कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले आहे. पनवेल येथील इंडियन इन्स्टिट्यूट ऑफ जिओमॅग्नेटिझम ( आय.आय. जी. ) आणि शिवाजी विद्यापीठाचा पदार्थविज्ञान अधिविभाग यांच्या संयुक्त विद्यमाने कार्यशाळा आयोजित करण्यात आली आहे. पदार्थविज्ञान विभागाच्या सभागृहात गुरुवारी सकाळी १० वाजता कुलगुरू डॉ. देवानंद शिंदे यांच्या हस्ते कार्यशाळेचे उद्‌घाटन करण्यात येईल. कार्यशाळामध्ये डॉ. माला बागिया, प्रा. एस. गुरुबारन, डॉ. गोपी सिमाला, डॉ. मानसिंग टाकळे, डॉ. सुकंठ साऊ, डॉ. विनित एरम आदी देशभरातील तज्ज्ञ मार्गदर्शन करणार आहेत.

जनसंपर्क कक्ष
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर
27 FEB 2020
तरुण भारत

# न्यायव्यवस्थेत विद्यार्थ्यांसाठी करिअरच्या मोठ्या संधी

पान १ वरुन

प्राचार्य डॉ. नारायणन यांच्या हस्ते बक्षीस वितरण करण्यात आले. मोट कोर्टमध्ये कोल्हापूर विधी विभाग, डॉ. डी. वाय. पाटील लॉ कॉलेज यांनी प्रथम तर सातारा येथील इस्माईल मुल्ला लॉ कॉलेज आणि कोल्हापुरातील शहाजी लॉ कॉलेजने द्वितीय क्रमांक मिळवला. मोटिव्हेशनमध्ये ईस्माईल मुल्ला कॉलेज तर क्लाईट इंटरव्ह्यूमध्ये सांगली येथील भारती विद्यापीठ न्यु कॉलेजला गौरवण्यात आले.

स्पर्धेसाठी डॉ. विवेक धुपदाळे, डॉ. चंद्रानी बागडी, ॲड. अभिजित शितोळे, चेतन घाटगे, शौर्यशीला पाटील, स्वाती गावडे, किरण मुळे, स्नेहल जाधव, उदयराज हिलाल, विराज कदम, शिवराज भोसले, धनश्री गुजर, सुषमा कोकाटे, मैनुद्दीन मुल्लाणी, योगिता जाधव, प्रमोद भोसले, निकिता शिंदे, वैभव कांबळे, ज्ञानेश्वरी मोहिते यांनी परिश्रम घेतले.

# विद्यापीठात २८ पासून मोफत किचन गार्डन प्रशिक्षण

**कोल्हापूर / प्रतिनिधी :**

शिवाजी विद्यापीठातील लोकविकास केंद्रामार्फत फेब्रुवारीपासून सोळा आठवडे कालावधीचा मोफत किचन गार्डन प्रशिक्षण वर्ग सुरू होत आहे. दि. २८ फेब्रुवारी ते दि. २६ जून या कालावधीत प्रत्येक शुक्रवारी, दु. १ ते ३ यावेळेत लोकविकास केंद्र कार्यालये येथे होणार आहे. या प्रशिक्षणात घरगुती कचऱ्याचे व्यवस्थापन, भाजीपाला व फळे यांची लागवड, टेरेस व बाल्कनी गार्डन, होमगार्डन, ग्राफ्टिंग तसेच जैविक खते व जंतुनाशके, किचन गार्डनिंगचे विविध प्रकार शिकवले जातात.

जनसंपर्क कक्ष
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर
27 FEB 2020
तरुण भारत

# कार्निवल महोत्सवाचा समारोप

कोल्हापूर

विदेशी भाषा विभागातील कार्निवल–२०२० या कला–सांस्कृतिक महोत्सवाचा समारोप बुधवारी झाला. याप्रसंगी विदेशी भाषांतील विद्यार्थ्यांनी सुरेल, समूहगीते, युद्धगीते, लोकनृत्यांचा अविष्कार सादर करीत उपस्थितांची मने जिंकली.

या कार्निवलमधून विद्यार्थ्यांनी रशियन, जर्मन, जपानी व पोर्तुगीज भाषेतील विविध स्वरूपाचे खेळ, भाषिक कौशल्य उपक्रम व सांस्कृतिक कार्यक्रमांतून विविध संस्कृतीचे दर्शन घडवून आणले. प्रेक्षकांनी या कार्यक्रमांचे कौतुक केले. यावेळी हस्तलेखन स्पर्धांचे विजेते मैत्रेयी कुलकर्णी, साक्षी मेथे (रशियन), तनय कोळेकर (जर्मन), ज्योत्स्ना भाटवडेकर व दीपिका भोसले (जपानी) यांना सन्मानित करण्यात आले. यावेळी डॉ. मेघा पानसरे, स्नेहा वझे, स्नेहल शेट्ये, शीतल कुलकर्णी, प्रियांका माळकर आदी उपस्थित होते.

# यंदाचा सांगीतिक शिव-महोत्सव उद्या

## 'विवेकानंद'ला 'शिव-जीवन गौरव' पुरस्कार; भरगच्च सांस्कृतिक कार्यक्रम

सकाळ वृत्तसेवा

**कोल्हापूर, ता. २६ : प्रबोधनपर सांस्कृतिक जीवनाचा अविभाज्य घटक बनलेला 'शिव-महोत्सव' (शिवाजी विद्यापीठ आजी माजी विद्यार्थी स्नेहमेळावा) शुक्रवारी (ता. २८) दुपारी चार वाजता राजमाता जिजाऊसाहेब सभागृहात होणार आहे. महोत्सवात श्री स्वामी विवेकानंद शिक्षण संस्थेला 'शिव-जीवन गौरव' पुरस्कार देऊन गौरविण्यात येणार आहे.**

इतरही शिव-पुरस्कार प्रदान करण्यात येणार आहेत. दरवर्षीप्रमाणे सांस्कृतिक कार्यक्रम होतील, अशी माहिती महोत्सवाचे संकल्पक, संस्थापक अध्यक्ष डॉ. प्रवीण कोडोलीकर यांनी दिली. यंदाच्या शिवमहोत्सवाचे मुख्य आकर्षण निवृत्ती महाराज इंदोरीकर यांचा कीर्तन सोहळा असेल. उपस्थितांनी येताना बरोबर वही-पेन घेऊन यावे. ते महाराज चालवित असलेल्या आश्रमातील निराश्रित बालकांना देण्यात येईल, असे आवाहनही डॉ. कोडोलीकर यांनी केले आहे.



पुरस्कार वितरण समारंभानंतर सांस्कृतिक कार्यक्रम होतील. 'मी होणार सुपरस्टार' फेम श्रावणी महाजन, 'अप्सरा आली' कार्यक्रमाची विजेती माधुरी पवार या यंदाच्या शिव-महोत्सवात सादरीकरण करणार आहेत. गायिका पूजा गोटखिंडेकर-पाटील, मिमिक्री आर्टिस्ट बाहुबली राजमाने, श्वास अॅकॅडमीतर्फे सुभेदार तान्हाजी मालुसरे यांच्या कार्यावर आधारित सादरीकरण होणार आहे.

सँड आर्टिस्ट अमित माळकरी, ओंकार शेटे, विश्वविक्रमी नृत्य-दिग्दर्शक सागर बगाडे, चंद्रकांत पाटील, निवेदक डॉ. सत्यजीत कोसंबी यांचाही या सांस्कृतिक कार्यक्रमात सक्रिय सहभाग असेल.

तंजावरचे प्रिन्स शिवाजीराजे टी. भोसले, खासदार संजय मंडलिक, अण्णासाहेब पाटील महामंडळाचे उपाध्यक्ष संजय पवार, पश्चिम महाराष्ट्र देवस्थान समितीचे सचिव विजय पोवार, डॉ. विजयकुमार माने, कुलगुरू डॉ. देवानंद शिंदे, प्र-कुलगुरू डॉ. डी.टी. शिर्के, कुलसचिव डॉ. विलास नांदवडेकर, राजाराम महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. अण्णासाहेब खेमणार, विभागीय सहसंचालक डॉ. अशोक उबाळे, प्राचार्य डॉ. अभयकुमार साळुंखे, परीक्षा संचालक गजानन पळसे, वित्त व लेखाधिकारी व्ही. टी. पाटील, डॉ. डी. पी. माने, श्रीमती प्रतिभा दीक्षित, प्राचार्य डॉ. डी. आर. मोरे, इतिहासकार इंद्रजीत सावंत, सुनील पाटील (नाशिक), सचिन मांगले, डॉ. डी. के. गायकवाड, शीतल माने, शशिकांत बोराळकर, डॉ. रोहित कोळेकर उपस्थित राहतील.

### प्रवेशिका मोफत

कार्यक्रमाच्या मोफत प्रवेशिका सलगर अमृततुल्य चहा आणि श्री स्वामी समर्थ नेट कॅफे, सायबर चौक येथे उपलब्ध असून प्रवेशिकांसाठी संपर्क साधावा. रसिकांनी मोठ्या संख्येने उपस्थित राहून लाभ घ्यावा, असे आवाहन डॉ. कोडोलीकर यांनी केले आहे.

# राष्ट्रीय विज्ञान सप्ताहाचे शिवाजी विद्यापीठात उद्घाटन

कोल्हापूर, ता. २६ : शिवाजी विद्यापीठातील प्राणिशास्त्र अधिविभागातर्फे राष्ट्रीय विज्ञान सप्ताहाला सुरवात झाली. शास्त्रज्ञ डॉ. कृष्णमेघ कुंटे यांच्या हस्ते उद्घाटन झाले. विज्ञान व तंत्रज्ञान अधिशाखेचे अधिष्ठाता प्रा. पी. एस. पाटील अध्यक्षस्थानी होते. वित्त व लेखा अधिकारी व्ही. टी. पाटील, संयोजक प्राणिशास्त्र विभागप्रमुख डॉ. व्ही. एस. मन्त्रे, कार्यक्रम समन्वयक डॉ. एम. व्ही. वाळवेकर उपस्थित होते.

शुक्रवारी (ता. २८) राष्ट्रीय विज्ञान दिन साजरा केला जातो. यानिमित्त विद्यार्थ्यांत विज्ञानाची गोडी वाढावी म्हणून शिवाजी विद्यापीठ आठवडाभर अगोदर विज्ञानविषयक विविध कार्यक्रमांचे आयोजन करते. यावर्षीचा राष्ट्रीय विज्ञान सप्ताहाचा विषय आहे.

डॉ. वाळवेकर म्हणाल्या, ''मेरी क्युरी यांनी भौतिकशास्त्रात मोलाचे योगदान दिले आहे. तसेच डीएनएच्या संशोधनातही रोझालिंड फ्रेन्कलीन यांनी खूप मोठे योगदान दिले. महिलांचे संशोधनातील योगदान अधोरेखीत केले.'' संयोजक डॉ. मन्त्रे यांनी विषयास अनुसरून प्रश्नमंजुषा, वक्तृत्व स्पर्धा, निबंध स्पर्धा तसेच चित्रफिती, विविध विषयातील नामांकित व्यक्तींची व्याख्याने, विज्ञान प्रदर्शन अशा कार्यक्रमाचे आयोजन केल्याचे सांगितले.

सकाळी जागतिक तापमान वाढीचे पृथ्वीवरील परिणाम यावरील विज्ञान फेरीचे शिवाजी विद्यापीठ ते दसरा चौक असे आयोजन केले आहे. तसेच त्यांनी राष्ट्रीय विज्ञान सप्ताह हा सर्व विद्यार्थ्यांसाठी एक वैज्ञानिक पर्वणी असल्याचे सांगितले. विद्यार्थ्यांना, नागरिकांना विज्ञान प्रदर्शनात सहभाग घेण्यासाठी, पाहण्यासाठी येण्याचे आवाहन केले आहे.

डॉ. कुंटे यांनी महिलांचे जैवविविधता क्षेत्रातील योगदानावर प्रकाश टाकला. व्ही. टी. पाटील यांनी विद्यापीठाचे महिलांना संशोधानासाठी प्रोत्साहनाबद्दल सांगितले. प्रा. पी. एस. पाटील यांनी विविध वैज्ञानिक महिला आणि त्यांचे वैज्ञानिक क्षेत्रातील योगदान याबद्दल माहिती दिली. प्रा. पाटील यांनी मेरी क्युरी यांच्या जीवनातील महत्त्वाचे प्रसंग सांगताना त्यांचे समर्पण व योगदान मोठे असल्याचे नमूद केले. डॉ. एम. पी. भिलावे यांनी आभार मानले.

# जैवविविधतेचे जतन करणे काळाची गरज : डॉ. बाचूळकर



कोल्हापूर, ता. २६ : ''पृथ्वीवर असलेल्या फक्त १८ ते २० टक्के जैवविविधतेचा शास्त्रीय दृष्टिकोनातून अभ्यास झाला आहे. पृथ्वीच्या आणि पर्यायाने सर्व सजीवांच्या अस्तित्वासाठी आवश्यक असणारी जैवविविधता समजून घेण्यापूर्वीच नष्ट होत आहे,'' असे प्रतिपादन डॉ. मधुकर बाचूळकर यांनी केले. शिवाजी विद्यापीठाच्या पर्यावरणशास्त्र विभागातर्फे झालेल्या प्रा. नरहर विष्णू कारेकर विज्ञानविषयक व्याख्यानमालेत 'जैवविविधतेचे मानवी जीवनावरील परिणाम' यावर व्याख्यान झाले.

डॉ. बाचूळकर म्हणाले, ''जगभरात केवळ १७ देश जैवविविधतेने नटले आहेत. त्यात भारताचा समावेश असणे जरी आनंद, अभिमान वाटणारी गोष्ट असली तरी जैवविविधता नष्ट करत चाललेल्या देशांच्या यादीत देखील भारताचा समावेश आहे हा खेद आहे. सध्या विकासाच्या नावाखाली जंगले जाळून टाकली जात आहेत; पण त्यातून होणारी हानी ही कधीही न भरून काढता येणारी, मोजदाद न करत येणारी आहे. आपण ज्या पश्चिम घाटात राहतो, तो भूभाग निसर्गाची मुक्त उधळण केलेला आहे. तेथील निसर्गसंपत्ती पुढच्या पिढीसाठी जपून ठेवणे हे आपले कर्तव्य आहे.''

पर्यावरणशास्त्र विभागप्रमुख डॉ. पी. डी. राऊत म्हणाले, ''जैवविविधतेचं संवर्धन करणे हि प्रत्येकाची नैतिक जबाबदारी आहे. ती प्रत्येकाने वयक्तिक पातळीवर पार पडणे महत्वाचे आहे; अन्यथा भविष्यात आपणास नैसर्गिक आपत्तींना तोंड द्यावे लागेल.'' डॉ. आसावरी जाधव यांनी प्रास्ताविक केले. निर्मला पोखर्णीकर यांनी आभार मानले.

# डॉ. आवारे लिखित पुस्तकाचे आज प्रकाशन

कोल्हापूर : येथील महावीर महाविद्यालयाच्या मराठी वाङ्मय मंडळाच्या माजी विद्यार्थिनी डॉ. सुप्रिया आवारे लिखित 'न बांधल्या जाणाऱ्या घरात' काव्यसंग्रहाचे प्रकाशन गुरुवारी (ता.२७) होणार आहे. ज्येष्ठ कवयित्री नीरजा, शिवाजी विद्यापीठ मराठी विभागप्रमुख डॉ. रणधीर शिंदे, डॉ. सुषमा रोटे यांची प्रमुख उपस्थिती असेल. महावीर महाविद्यालयाच्या ॲम्फी थिएटरमध्ये दुपारी बाराला कार्यक्रम होईल.

# मानवी हस्तक्षेपामुळे जैवविविधता धोक्यात : डॉ. मधुकर बाचूळकर

आर. के. नगर, ता. २६ : 'जागतिक स्तरावरील जैवविविधतेसाठी मोठ्या प्रमाणात वृक्ष लागवड करुन संवर्धन करण्याची गरज आहे. मानवी हस्तक्षेपामुळे जागतिक पातळीवर जैवविविधता धोक्यात आली आहे, असे प्रतिपादन पर्यावरण तज्ज्ञ डॉ. मधुकर बाचुळकर यांनी केले.

ऑस्ट्रेलियातील जंगलातील वणवा या सारख्या गंभीर घटना घडत असल्यामुळे मानवाने जैवविविधतेचे संरक्षण करणे काळाची गरज आहे, असे मत डॉ. बाचुळकर यांनी व्यक्त केले. गोखले महाविद्यालयात वनस्पतीशास्त्र विभाग, बी. व्होक सस्टेनेबल अॅग्रीकल्चर मॅनेजमेंट विभागातर्फे बायो डायव्हरसिटी कॉन्झरवेशन यावरील एकदिवसीय कार्यशाळा झाली. प्राचार्य डॉ. पी. के. पाटील अध्यक्षस्थानी होते. विभागप्रमुख प्रा. डॉ. आर. पी. जाधव यांनी प्रास्ताविक केले.

प्राचार्य डॉ. बाचूळकर यांच्या हस्ते रोपाला पाणी घालून कार्यशाळेचे उद्घाटन झाले. प्रा. डॉ. मकरंद ऐतवडेकर, प्रा. डॉ. मानसिंग निंबाळकर यांचे मनोगत झाले. विविध महाविद्यालयांतील ६४ विद्यार्थ्यांनी आणि १५ सहयोगी प्राध्यापकांनी सहभाग घेतला. प्रा. जयकुमार देसाई, दौलत देसाई, प्रा. डॉ. मंजिरी मोरे यांचे मार्गदर्शन लाभले. उपप्राचार्य एस. एच. पिसाळ, प्रा. डॉ. सौ. मृणालिनी देसाई, प्रा. श्रुती पाटील आदी उपस्थित होते.

जनसंपर्क कक्ष
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर
27 FEB 2020
तरुण भारत

# शिवाजी विद्यापीठात उद्या शिवमहोत्सवाचे आयोजन

- विवेकानंदला 'शिव-जीवन गौरव' पुरस्कार
- आजी-माजी विद्यार्थी संघटनेचे अध्यक्ष डॉ. कोडोलीकर यांची माहिती

**प्रतिनिधी**
कोल्हापूर

शिवाजी विद्यापीठ आजी माजी विद्यार्थी संघटनेचा 'शिव–महोत्सव' (स्नेहमेळावा) शुक्रवार, २८ रोजी आहे. सायंकाळी ४ वाजता शिवाजी विद्यापीठाच्या राजमाता जिजाऊसाहेब सभागृहात पुरस्कार वितरणासह सांस्कृतिक कार्यक्रमांचे आयोजन करण्यात आले आहे. स्वामी विवेकानंद शिक्षण संस्थेला यंदाचा 'शिव–जीवन गौरव' पुरस्कार देऊन गौरविण्यात येणार आहे. इतर मान्यवरांना शिव–पुरस्कार प्रदान करण्यात येणार आहेत. सांस्कृतिक कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले आहे, अशी माहिती महोत्सवाचे संकल्पक व संस्थापक अध्यक्ष डॉ. प्रविण कोडोलीकर यांनी पत्रकाव्दारे दिली आहे.

यंदाच्या शिवमहोत्सवाचे मुख्य आकर्षण ह. भ. प. निवृत्ती महाराज इंदोरीकर यांचा कीर्तन सोहळा असणार आहे. उपस्थितांनी येताना सोबत एक वही–पेन घेऊन यावे, ते महाराज चालवित असलेल्या आश्रमातील निराश्रित बालकांना देण्याचे आवाहनही डॉ. कोडोलीकर यांनी केले आहे. पुरस्कार वितरण समारंभानंतर सांस्कृतिक कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले आहे. 'मी होणार सुपरस्टार'फेम श्रावणी महाजन, 'अप्सरा आली' कार्यक्रमाची विजेती माधुरी पवार या यंदाच्या शिव–महोत्सवात सादरीकरण करणार आहेत. सुप्रसिद्ध गायिका पूजा गोटखिंडेकर–पाटील, मिमिक्री आर्टिस्ट बाहुबली राजमाने, त्याचबरोबर श्वास अकॅडमीतर्फे सुभेदार तानाजी मालुसरे यांच्या कार्यावर आधारित भव्य सादरीकरण होणार आहे. सँड आर्टिस्ट अमित माळकरी, ओंकार शेटे, नृत्य–दिग्दर्शक सागर बगाडे, चंद्रकांत पाटील, निवेदक डॉ. सत्यजीत कोसंबी यांचाही या सांस्कृतिक कार्यक्रमात सहभाग आहे.

कार्यक्रमास तंजावरचे प्रिन्स शिवाजीराजे टी. भोसले, खासदार संजय मंडलिक, अण्णासाहेब पाटील महामंडळाचे उपाध्यक्ष संजय पवार, पश्चिम महाराष्ट्र देवस्थान समितीचे सचिव विजय पोवार, डॉ. विजयकुमार माने, कुलगुरू डॉ. देवानंद शिंदे, डॉ. डी. टी. शिर्के, डॉ. विलास नांदवडेकर, प्राचार्य डॉ. अण्णासाहेब खेमणार, डॉ. अशोक उबाळे, प्राचार्य डॉ. अभयकुमार साळुखे, गजानन पळसे, व्ही. टी. पाटील, डॉ. डी. पी. माने, प्रतिभा दीक्षित, प्राचार्य डॉ. डी.आर. मोरे, इंद्रजीत सावंत आदी प्रमुख उपस्थित राहणार आहेत.

# शिवरायांचे व्यवस्थापन प्रेरणादायी

## डॉ. शिंदे ; रायरेश्वर येथे 'एनएसएस'तर्फे विद्यापीठस्तरीय श्रमसंस्कार शिबिर



रायरेश्वर : येथे शिवाजी विद्यापीठातर्फे आयोजित राष्ट्रीय सेवा योजनेच्या विद्यापीठस्तरीय कार्यक्रमास उपस्थित मान्यवर.

**कोल्हापूर, ता. २६ :** ''छत्रपती शिवरायांचे व्यवस्थापन कौशल्य हे तत्कालीन परिस्थितीप्रमाणेच आजही तितकेच प्रेरणादायी आहे,'' असे प्रतिपादन शिवाजी विद्यापीठाचे कुलगुरू डॉ. देवानंद शिंदे यांनी केले. रायरेश्वर येथे झालेल्या राष्ट्रीय सेवा योजनेच्या विद्यापीठस्तरीय विशेष श्रमसंस्कार शिबिरात ते बोलत होते.

कुलगुरू डॉ. शिंदे म्हणाले, ''अफझलखानाचा वध ही काही एका दिवसात झालेली घटना नव्हती, तर महाराजांनी त्यासाठी वर्षभर आधी तयारी केली होती. यात वेळ, ठिकाणाबरोबरच कोण मावळे सोबत घ्यावयाचे, या विषयी तयारी केल्याचे आढळते. यातून महाराजांच्या व्यवस्थापन कौशल्याची आणि कुशल नेतृत्वाची प्रचीती येते. महाराजांच्या या गुणांचा अभ्यास करून स्वतःच्या जीवनात कसा बदल करावा, या विषयी तरुणांनी विचार करावा.'' श्रमसंस्कार शिबिरातील विद्यार्थ्यांनी केलेल्या रस्त्याच्या कामाचे गुणगान केले. व्ही. जी. पवार यांनी धन्यवाद दिले. प्र-कुलगुरू डॉ. डी. टी. शिर्के म्हणाले, ''वयाच्या सोळाव्या वर्षी शिवरायांनी स्वराज्याची शपथ घेतली, त्या पवित्र ठिकाणी आपण उपस्थित आहोत, हे आपले भाग्य आहे. सोळाव्या वर्षी केलेला संकल्प त्यांनी सत्यात उतरविला.'' किसनवीर महाविद्यालयाने शिबिराचे यजमानपद स्वीकारल्याबद्दल विद्यापीठातर्फे त्यांनी आभार मानले.

प्राचार्य डॉ. आय. एफ. पैलवान यांनी प्रास्ताविक केले. तत्पूर्वी, गडावर पोचल्यावर स्वयंसेवकांनी केलेल्या रस्त्याचे कुलगुरूंनी ग्रामस्थांबरोबर उद्‌घाटन केले. तयार केलेल्या रस्त्यावरून कुलगुरू डॉ. शिंदे, डॉ. शिर्के व अन्य मान्यवरांनी बैलगाडीने प्रवास केला. राष्ट्रीय सेवा योजनेच्या स्वयंसेवकांनी सर्वांचे स्वागत केले. प्राचार्य डी. आर. मोरे, डॉ. डी. के. गायकवाड, क्रीडा संचालक डॉ. पी. टी. गायकवाड, राष्ट्रीय सेवा योजनेचे संचालक डॉ. अभय जायभाये उपस्थित होते.

# किचन गार्डन प्रशिक्षण नवीन बॅच सुरू

कोल्हापूर, ता. २६ : शिवाजी विद्यापीठातील लोकविकास केंद्रामार्फत फेब्रुवारीपासून १६ आठवडे कालावधीचा किचन गार्डन प्रशिक्षण वर्ग सुरू होत आहे. हा कार्यक्रम २८ फेब्रुवारीपासून २६ जूनपर्यंत प्रत्येक शुक्रवारी दुपारी एक ते तीन वेळेत लोकविकास केंद्र कार्यालयात होईल.

या प्रशिक्षणात घरगुती कचऱ्याचे व्यवस्थापन, भाजीपाला आणि फळे यांची लागवड, टेरेस आणि बाल्कनी गार्डन, होम गार्डन, ग्राफटिंग तसेच जैविक खते, जंतुनाशके, किचन गार्डनिंगचे विविध प्रकार शिकवले जातात. हा कार्यक्रम पूर्णपणे मोफत असून, त्यासाठी वयाची, शिक्षणाची कोणतीही अट नाही. इच्छुकांनी लाभ घ्यावा, असे आवाहन लोकविकास केंद्रातर्फे केले आहे. माहितीसाठी डॉ. मंजूषा देशपांडे यांच्याशी संपर्क साधावा.

# भू-अवकाश विज्ञानाबाबत आज कार्यशाळा

कोल्हापूर : शिवाजी विद्यापीठात गुरुवारी (ता. २७) 'अर्थ अँड स्पेस सायन्स' यावर एकदिवसीय कार्यशाळा, प्रशिक्षण कार्यक्रमाचे आयोजन केले आहे. पनवेल येथील इंडियन इन्स्टिट्यूट ऑफ जिओमॅग्नेटिझम (आय. आय.जी.) आणि शिवाजी विद्यापीठाचा पदार्थविज्ञान अधिविभागातर्फे कार्यशाळा होईल. पदार्थविज्ञान विभागाच्या सभागृहात सकाळी दहा वाजता कुलगुरू डॉ. देवानंद शिंदे यांच्या हस्ते कार्यशाळेचे उद्घाटन होईल. सभागृहासह विद्यापीठ परिसरातील 'आयआयजी'च्या रडार सुविधा केंद्रात विविध सत्रांत कार्यशाळा आणि प्रशिक्षण कार्यक्रम होईल. यामध्ये डॉ. माला बागिया, प्रा. एस. गुरुबारन, डॉ. गोपी सिमाला, डॉ. मानसिंग टाकळे, डॉ. सुकंठ साऊ, डॉ. विनित एरम आदी तज्ज्ञ मार्गदर्शन करणार आहेत.

जनसंपर्क कक्ष
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर

तरुण भारत

27 FEB 2020

# न्यायव्यवस्थेत विद्यार्थ्यांसाठी करिअरच्या मोठ्या संधी

## निवृत्त जिल्हा न्यायाधीश एस. पी. कुलकर्णी : विधी मेळावा उत्साहात

प्रतिनिधी

कोल्हापूर

न्यायव्यवस्थेत विद्यार्थ्यांसाठी करिअरच्या मोठ्या संधी आहेत. शिवाजी विद्यापीठ स्तरावर राबवलेला मोट स्कूल स्पर्धेचा लाभ विद्यार्थ्यांना उच्च न्यायालयात वकिली करताना निश्चितच होईल, असा विश्वास निवृत्त जिल्हा न्यायाधीश एस. पी. कुलकर्णी यांनी व्यक्त केला.

सातव्या ऑल इंडिया अल्टरनेटिव्ह डिस्प्युट रिसोल्यूशन स्पर्धेच्या उद्घाटनप्रसंगी ते प्रमुख बोलत होते. अध्यक्षस्थानी ॲड. सदानंद मानकर होते. शिवाजी विद्यापीठात मोट स्कूल अंतर्गत विधी मेळावा घेण्यात आला. यावेळी शहाजी लॉ कॉलेजचे प्राचार्य डॉ. आर. नारायणन, डॉ. मंगला पाटील-बडदारे, ॲड. प्रवीण देशपांडे यांची प्रमुख उपस्थिती होती. शिवाजी विद्यापीठातील विधी विभाग प्रमुख डॉ. विवेक धुपदाळे यांनी स्वागत केले. डॉ. चंद्रानी बागडी यांनी आभार मानले. स्पर्धेत पुणे, सातारा, सांगली, बेळगाव, चिक्कोडीतील संघ सहभागी झाले.

स्पर्धेच्या बक्षीस वितरणप्रसंगी कुडाळ येथील व्हिक्टर दांतास कॉलेज ऑफ लॉमधील प्रा. राजशेखर मुलुष्टे यांनी, स्पर्धेत टिकण्यासाठी विद्यार्थ्यांनी भाषेवर प्रभुत्व मिळवावे, असे आवाहन केले. बार असोशिएशनचे अध्यक्ष ॲड. रणजित गावडे यांनी सर्वोच्च न्यायालयाने वाद मिटवण्यासाठी संवेदनशील प्रकरणात मध्यस्थाची भूमिका बजावली आहे. यातून समाजात मध्यस्थाची भूमिका महत्वपूर्ण असल्याचे त्यांनी सांगितले.



**कोल्हापूर : शिवाजी विद्यापीठात विधी मेळावा घेण्यात आला. यावेळी निवृत्त न्यायाधीश एस. पी. कुलकर्णी, ॲड. सदानंद मानकर, ॲड. रणजित गावडे आदी उपस्थित होते.**

पान ६ पहा